१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• पुणे, शनिवार २३ मे, २०२६ • वर्ष-५, अंक-२४३, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 243 Marathi - Daily - Pune, 23 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

यंदाची जनगणना: नक्की काय बदलले?

navakal.in

@navakal.news | Navakal Digital Network | @_NDN_Offical | @NavakalNews

## थोडक्यात...

### उमर खालिदला अखेर ३ दिवसांचा अंतरिम जामीन

**नवी दिल्ली -** २०२० च्या दिल्ली दंगली प्रकरणातील आरोपी, जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचा (जेएनयू) माजी विद्यार्थी उमर खालिद याला आज दिल्ली उच्च न्यायालयाने तीन दिवसांचा अंतरिम जामीन मंजूर केला.खालिदच्या आईवर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. त्यावेळी तिच्यासोबत राहण्यासाठी न्यायालयाने त्याला हा अंतरिम जामीन मंजूर केला. खालिदने याआधी कनिष्ठ न्यायालयात १५ दिवसांच्या अंतरिम जामिनासाठी अर्ज केला होता. १९ मे रोजी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने त्याचा अर्ज नामंजूर केला. कनिष्ठ न्यायालयाच्या या निर्णयाला खालिदने दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान दिले. या याचिकेवर आज सुनावणी झाली. त्याप्रसंगी दिल्ली पोलिसांच्या वतीने युक्तिवाद करताना ॲडिशनल सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू यांनी त्याच्या अंतरिम जामिनाला विरोध केला. मात्र न्यायालयाने खालिदच्या याचिकेचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्याला १ ते ३ जूनपर्यंत अंतरिम जामीन मंजूर केला.

# भाकरी खाता की चपाती? एसी, वायफाय आहे? नोकरदार किती?

# जनगणना की आर्थिक सर्व्हे? सरकारी योजना बंद करणार?

■ मुंबई



**देशात २०११ नंतर १५ वर्षांनी जनगणनेची प्रक्रिया सुरू झाली आहे. महाराष्ट्रात आता खास नियुक्त कर्मचारी घरोघरी फिरून पहिल्या टप्प्यात घर नोंदणी करत आहेत. मात्र यावेळी ते जे प्रश्न विचारत आहेत ते ऐकून नागरिक चक्रावले आहेत. तुम्ही भाकरी खाता की चपाती? तांदूळ कोणता वापरता? तुमच्या घरात लाद्या कुठल्या आहेत? नोकरदार किती आहेत? मोबाईल डेटा वापरता की वायफाय आहे? असे अनेक प्रश्न विचारले जात आहेत. जर जनगणना केली जात आहे तर हे प्रश्न का विचारले जात आहेत असा सवाल आहे. जनगणनेच्या आडून सरकार आर्थिक सर्व्हे करत असून, यावरून निष्कर्ष काढत रेशनसारख्या सरकारी योजना बंद करण्याचा सरकारचा अंतिम मानस आहे, अशी आता चर्चा सुरू झाली आहे.**

**पूर्वी** जनगणनेत केवळ घरातील सदस्यांची संख्या आणि वार्षिक उत्पन्न यांसारख्या माहितीवर भर दिला जात असे. मात्र, २०२६ च्या जनगणनेसाठी तयार करण्यात आलेल्या प्रश्नावलीत अनेक बारीकसारीक आणि कौटुंबिक जीवनशैलीशी निगडित प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे. तुमच्या घरात खोल्यांची संख्या किती आहे? घरात स्वतंत्र शौचालय आणि स्नानगृह आहे का? शौचालयाचा प्रकार कोणता आहे? तुमच्या घरातील सांडपाण्याचा निचरा कुठे होतो? ते पाईपद्वारे सांडपाणी व्यवस्थेशी जोडले आहे का? सांडपाणी सेप्टिक टँकमध्ये जाते की, उघड्या नाल्यात जाते? घराला टाईल्स लावल्या आहेत का? घराच्या भिंती कशाच्या आहेत? घराचे छप्पर कशाचे आहे? घराला कौले किंवा पत्रा असेल, तर ते संपूर्ण घराला आहे की फक्त बाल्कनीला आहे? तुम्ही तुमचे घर फक्त राहण्यासाठी वापरता की दुकान, हॉटेल, लॉज, गेस्ट हाऊस, दवाखाना इत्यादीसाठी त्याचा वापर करता? या घराची स्थिती कशी आहे? घराला किरकोळ दुरुस्तीची गरज आहे, मोठ्या दुरुस्तीची गरज आहे? कुटुंबात किती विवाहित जोडपी राहतात? लिव्ह-इन रिलेशनशिपमधील जोडपी किती आहेत? नोकरी कितीजण करतात? बेरोजगार किती आहेत? असे अनेक प्रश्न विचारण्यात येत आहेत.

याव्यतिरिक्त यंदाच्या जनगणनेत नागरिकांच्या आहाराच्या सवयी आणि स्वयंपाकाशी संबंधित माहितीही गोळा केली जात आहे. अन्न शिजवण्यासाठी कोणत्या प्रकारचे इंधन वापरता? पीएनजी, एलपीजी की चुलीचा वापर करता? प्रामुख्याने कोणत्या प्रकारचे धान्य रोजच्या जेवणात वापरता? आहारात चपाती-भात की भाकरी खाता? दररोज किती आहार घेता? घरातील पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत कोणता आहे? पालिकेकडून पाणी येते का? की विहीर, बोरवेल, तलाव, कालवा की नाल्याद्वारे येते? नळ असेल, तर तो घरात आहे की जवळपासच्या परिसरात आहे? हे प्रश्नही विचारण्यात येत आहेत. सरकारी धोरणे ठरवण्यासाठी ही माहिती आवश्यक असते. जनगणनेशी त्याचा काय संबंध आहे?

जनगणनेत सरकारने नागरिकांच्या तांत्रिकतेविषयी माहिती जाणून घेण्यावरही विशेष लक्ष दिले आहे. यासंबंधी विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांमध्ये घरात रेडिओ किंवा टीव्ही आहे का? डिश, केबल किंवा इतर कनेक्शन आहे का? कुटुंबातील सदस्य इंटरनेटचा वापर करण्यासाठी वाय-फाय तंत्रज्ञानाचा वापर करतात की केवळ मोबाईल डेटावर अवलंबून आहेत? संगणक आहे का? कोणत्या प्रकारचा मोबाईल आहे? कुटुंबाकडे किती आणि कोणती वाहने आहेत? यासारखी वैयक्तिक माहितीही गोळा केली जात आहे.

हा जनगणनेचा पहिला टप्पा आहे. प्रशासकीय सोयीसाठी सरकारने कागदी नोंदींची जुनी पद्धत बंद करून डिजिटल प्रणालीचा अवलंब केला आहे. यामुळे माहिती संकलन वेगवान होणार आहे. सर्व माहिती एकाच ॲपमध्ये साठवली जात असल्याने प्रत्येक कुटुंबाची आर्थिक आणि सामाजिक स्थिती आता सरकारला एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. जनगणनेसाठी नेमलेल्या बहुसंख्य कर्मचाऱ्यांकडे ओळखपत्रच नसल्याने त्यांनी घरोघर जाऊन असे प्रश्न विचारले की, संशय निर्माण होतो आहे. अनेक निवासी सोसायट्यांमध्ये त्यांना प्रवेश नाकारण्याच्या घटनाही घडत आहेत. सरकारने याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

## तानाजी सावंतांच्या मंत्रिपदाच्या काळात कॅथलॅब खरेदीत ३४५ कोटींचा घोटाळा

### मनसेच्या संदीप देशपांडेंचा आरोप

■ मुंबई

**महायुतीच्या** मागील सरकारमध्ये तानाजी सावंत आरोग्यमंत्री असताना महाराष्ट्र राज्यातील जिल्हा आणि उपजिल्हा रुग्णालयांमध्ये कॅथलॅब बसवण्याच्या प्रक्रियेत मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मुंबई शहराध्यक्ष संदीप देशपांडे यांनी आज केला. महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाने टेंडर प्रक्रिया पारदर्शकपणे राबवली नसून, सुमारे ३४५ कोटी रुपयांच्या खरेदी प्रक्रियेत गंभीर गैरव्यवहार झाल्याचा दावा त्यांनी केला.

संदीप देशपांडे म्हणाले की, २०१९ ते २०२४ या



कालावधीत महाराष्ट्र शासनाने १९ जिल्हा आणि उपजिल्हा रुग्णालयांमध्ये कॅथलॅब बसवण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवली होती. टेंडरच्या अटींनुसार दीड वर्षांच्या आत काम पूर्ण करणे बंधनकारक होते. तसे न झाल्यास दंड आकारून टप्प्याटप्प्याने पेमेंट करण्याची अट होती. यासाठी एनएल हेल्थ केअर प्रा. लि. यांना सुमारे ३४५ कोटी ३१ लाख २५ हजार २५० रुपयांचे, तर मीडियन हेल्थ केअर प्रा. लि. यांना सुमारे ३४६ कोटी १२ लाख ४८ हजार रुपयांत कॅथलॅब बसवण्याचे कंत्राट देण्यात आले. अनेक ठिकाणी काम पूर्ण झालेले नसतानाही संबंधित पान ७ वर

## देशातील सर्व हायकोर्टामध्ये ऑनलाईन सुनावणी घ्यावी

■ नवी दिल्ली

**देशातील** सर्व उच्च न्यायालयामध्ये व्हर्च्युअल अर्थात आभासी पद्धतीने ऑनलाईन सुनावणी घ्यावी, अशी विनंती सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी केली. मात्र यासंदर्भातील याचिकेवर सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने अनिच्छा व्यक्त केली.

एका वकिलाने देशहितासाठी आणि इंधन बचतीचा उपाय म्हणून दिल्लीतील सर्व न्यायालयांमध्ये ऑनलाईन पद्धतीने सुनावणी कामकाज करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी याचिका करत यावर तातडीने सुनावणी घेण्याची विनंती सर्वोच्च न्यायालयात केली आहे. यावर सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी स्पष्ट केले की,

### सरन्यायाधीशांची सूचना

हा विषय न्यायालयीन पातळीवर हाताळण्याचा नाही. या विषयावर न्यायालयीन आदेश जारी करणे योग्य ठरणार नाही. मी आधीच मुख्य न्यायमूर्तींना विनंती केली आहे. बहुतेकांनी याची अंमलबजावणीही केली आहे. ही वकील संघटना आणि न्यायपीठ दोघांनीही स्वेच्छेने करायची बाब आहे.

## एसआयआर प्रक्रिया ३० जूनपासून पात्र मतदाराचे नाव वगळणार नाही

■ मुंबई

**राज्यात** मतदारयादी पडताळणी (एसआयआर) प्रक्रिया ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत पारदर्शक पद्धतीने राबवली जाणार असून, कोणत्याही पात्र मतदाराचे नाव यादीतून वगळले जाणार नाही, असे आश्वासन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी दिले.

राज्य निवडणूक आयोगाची आज पत्रकार परिषद पार पडली. यावेळी चोकलिंगम म्हणाले की, राज्यात सध्या घरोघरी जनगणना सुरू आहे. त्यामुळे जनगणनेचे काम पूर्ण होईपर्यंत एसआयआर प्रक्रिया सुरू करू नये, अशी विनंती राज्याने निवडणूक आयोगाकडे केली होती. आयोगाने ती मान्य केली असून, ३० जूनपासून २९ जुलैपर्यंत बुथस्तरीय निवडणूक अधिकारी (बीएलओ) घरोघरी भेट देऊन माहिती गोळा करणार आहेत. या प्रक्रियेदरम्यान मतदारांनी आवश्यक माहिती देणे महत्त्वाचे आहे. २००२ ते २००४ दरम्यान झालेल्या एसआयआर वेळी मतदार कुठे होते, याची माहिती देणे आवश्यक असून, त्याला 'मॅपिंग' असे म्हटले जाते. हे काम मागील दोन महिन्यांपासून सुरू असून, आतापर्यंत सुमारे ७२ टक्के मॅपिंग पूर्ण झाले आहे.

ते पुढे म्हणाले की, राज्यातील ९ कोटी ८६ लाख मतदार नोंदींची पडताळणी करण्यात येणार असून, प्रारूप मतदार याद्या ५ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. तसेच, २९ जुलैनंतरही ज्यावेळी बीएलओ भेटीवेळी कोणी उपस्थित नसेल, त्यांना नाव नोंदवण्याची संधी उपलब्ध असेल. या मोहिमेसाठी राज्यात १ लाख २५३ बीएलओ नियुक्त करण्यात आले आहेत.

## मुंबईच्या उपनगरांत रिमझिम पाऊस पुढील ४८ तासांत जोर वाढणार

■ मुंबई

**मुंबईच्या** उपनगरातील मुलुंड, कांजूरमार्ग, भांडूप आणि घाटकोपर परिसरात आज पावसाने हजेरी लावली. अचानक बरसलेल्या रिमझिम सरींमुळे गेल्या काही महिन्यांपासून उकाड्याने हैराण झालेल्या मुंबईकरांना मोठा दिलासा मिळाला. गेल्या काही दिवसांपासून मुंबईतील तापमान सुमारे ३५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले होते. त्यामुळे वातावरणात प्रचंड उकाडा जाणवत होता.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

आज सकाळपासूनच मुंबई शहर आणि उपनगरांत ढगाळ वातावरण होते. त्यानंतर काही भागांत हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. मुलुंड, कांजूरमार्ग आणि भांडूप परिसरात रिमझिम पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाला. अचानक आलेल्या पावसामुळे कामावर जाणाऱ्या चाकरमान्यांची काही काळ तारांबळ उडाली. पुण्यात कोंडवा, हडपसर, सणसवाडी या ठिकाणी मुसळधार पावसाने हजेरी लावली. भोर शहराला जोणाऱ्या निरा नदीवरील राणी लक्ष्मीबाई पुलावर गुडघाभर पाणी साचल्याने रस्त्यांना नद्यांचे स्वरुप आले होते. पिंपरी-चिंचवड, हिंगोली आणि सोलापूर जिल्ह्यांमध्येही मान्सूनपूर्व अवकाळी पावसाने हजेरी लावली. हिंगोलीच्या वसमत पान ७ वर

## राज्यातील इंधन टंचाईमुळे परभणीत डिझेलसाठी शेतकऱ्यांना सातबाराची अट

■ मुंबई

**महाराष्ट्रातील** अनेक जिल्ह्यांमध्ये, विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यात, पेट्रोल-डिझेलची गंभीर टंचाई कायम असून, ऐन खरिपाच्या हंगामापूर्वी डिझेल मिळत नसल्याने शेतकरी, ट्रॅक्टरचालक आणि वाहनधारकांची मोठी अडचण झाली. परभणी जिल्ह्यात शेतकऱ्यांना डिझेल मिळवण्यासाठी सातबारा दाखवण्याची अट घालण्यात आल्याने संताप व्यक्त केला जात आहे.



डिझेल टंचाईच्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेल्या या नियमामुळे अनेक पेट्रोल पंपांवर गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतीकामांसाठी इंधन मिळण्यात अडचणी येत असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. डिझेल टंचाईची समस्या निर्माण होऊन आता जवळपास आठवडा उलटला असतानाही परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही. बुलडाणा, परभणी, हिंगोली आणि नंदुरबार जिल्ह्यांमध्ये डिझेलअभावी शेती मशागतीची पान ७ वर


## धारमध्ये शुक्रवारचा नमाज बंद भोजशाळेत पूजा, महाआरती

■ भोपाळ

**मध्य** प्रदेशातील धार येथील भोजशाळा येथे आज शुक्रवारचा नमाज अदा करण्यात आला नाही. आज येथे वाग्देवीची पूजा व महाआरती करण्यात आली.

मध्य प्रदेश उच्च न्यायालय यांच्या १५ मेच्या निर्णयानंतर आजचा पहिला शुक्रवार होता. त्यामुळे सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी झाली होती. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून धारमध्ये कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. समितीचे संरक्षक अशोक जैन यांनी सांगितले की, मंदिरात भोज उत्सव समितीने विशेष मूर्ती स्थापित केली आहे. तिची आज दुपारी १ ते ३ या वेळेत हवन आणि महाआरती करण्यात आली. शोभायात्रा काढण्याचा कार्यक्रमही होणार होता, पण तो रद्द करण्यात आला. न्यायालयाच्या निर्णयाविरोधात मुस्लीम पक्षाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. आदेश एकतर्फी असल्याचे सांगत काझी मोइनुद्दीन यांनी गुरुवारी रात्री सुमारे ८.३० वाजता विशेष परवानगी याचिका (एसएलपी) दाखल केली आहे. मशिदीचे प्रमुख अब्दुल समद म्हणाले की, कमाल मौला मशिदीत ७०० वर्षांपासून जुम्माची नमाज अदा केली जात आहे. ती बंद झाल्याने समाजात दुःख आहे. परंतु ही लढाई पूर्णपणे संविधानिक व कायदेशीर चौकटीतच लढली जाईल.

## कोकणात साकारणार देशातील पहिले समुद्राच्या तळाशी वसलेले संग्रहालय



**भारतीय नौदलातून निवृत्त करण्यात आलेली आयएनएस गुलदार ही युद्धनौका सिंधुदुर्ग जिल्ह्यात समुद्राच्या तळाशी स्थापित करण्याचे काम पूर्ण झाले आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी) या युद्धनौकेचे संग्रहालयामध्ये रुपांतर करणार आहे. पाण्याखाली असलेले देशातील हे पहिले संग्रहालय ठरणार आहे. साहसी पर्यटनाला प्रोत्साहन आणि सागरी परिसंस्थेबाबत संशोधनाला चालना देणे ही या संग्रहालयामागील मूळ उद्दिष्ट्ये आहेत.**

■ मुंबई

**राज्या राज्यांमध्ये** अशा प्रकारची लक्षणीय पर्यटन स्थळे विकसित करण्यासाठी केंद्र सरकार एका खास योजनेतून राज्यांना आर्थिक मदत देते. त्या योजनेतून या पाण्याखालच्या पहिल्यावहिल्या संग्रहालयाला केंद्राकडून अर्थसहाय्य केले जाणार आहे. तर संग्रहालय विकसित करण्याचे काम एमटीडीसीवर सोपवण्यात आले आहे. आयएनएस गुलदार ही युद्धनौका हेतूपुरस्सर समुद्रात बुडवण्याचे काम एमटीडीसीने माझगाव डॉक पान ७ वर

## भारतानंतर पाकिस्तानमध्येही कॉकरोच जनता पार्टीची धूम

■ इस्लामाबाद

**भारतात** गेले काही दिवस धुमाकूळ घालत असलेल्या कॉकरोच जनता पार्टीच्या धर्तीवर आता पाकिस्तानमध्येही अशाच प्रकारची ऑनलाईन चळवळ सुरू झाली आहे. कॉकरोच जनता पार्टीपासून प्रेरणा घेत पाकिस्तानमध्येही सोशल मीडियावर कॉकरोच अवामी लीग, कॉकरोच अवामी पार्टी अशा नावांनी खाती सुरू करण्यात आली आहेत. त्यांच्या फॉलोअर्सची संख्याही झपाट्याने वाढत आहे.

भारताचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी एका खटल्याच्या सुनावणीदरम्यान देशातील युवकांना झुरळाची (कॉकरोच) उपमा दिली होती. त्यांच्या या वक्तव्यावरून देशभरातील तरुणांत नाराजी पसरली. ती अभिजित दीपके या तरुणाने हेरली आणि त्यावर उपरोधात्मक कॉकरोच जनता पार्टीचा सोशल मीडियावर जन्म झाला. सरन्यायाधीशांनी दुसऱ्याच दिवशी आपल्या वक्तव्यावर सारवासारव केली. परंतु तोपर्यंत कॉकरोच जनता पार्टीचा वारू उधळला होता. अवघ्या तीन चार दिवसांत या उपहासात्मक राजकीय पक्षाचे तब्बल दोन कोटी सदस्य झाले. भारतातील सत्ताधारी भाजपा आणि प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेसलाही कॉकरोच पार्टीने मागे टाकले.



# नाट्य अभिनेते

# जयंत सावरकर



**रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यातून मोठ्या भावासोबत जयंत सावरकर नोकरी साठी मुंबईत आले. नोकरी सोडून जयंत सावरकर यांनी पूर्णपणे नाटकातच काम करायचे ठरविले तेव्हा त्यांचे सासरे नटवर्य मामा पेंडसे यांनी नोकरी सोडण्याला विरोध केला पण अभिनयाच्या कामासाठी पूर्ण पाठिंबा दिला. सावरकरांनी सासरेबुवांचा सल्ला मानला आणि श्रद्धा व निष्ठेने रंगभूमीची सेवा सुरू केली. जयंत सावरकर यांनी वयाच्या विसाव्या वर्षी, म्हणजे १९५५ पासून चेहऱ्याला रंग लावून कारकिर्दीची नांदी केली. रंगभूमीवर वावरायचे या एकाच प्रेरणेने ते झपाटले होते. त्यामुळे त्यांनी रंगभूमीवर जशी संधी मिळेल त्याचा लाभ घ्यायचे धोरण ठेवले.**

सुरुवातीची बरीच वर्षे ते बॅक स्टेज आर्टिस्ट म्हणून काम करत होते. त्याच वेळी ते नोकरीही करत होते. प्रारंभी हौशी नाट्यसंस्थांमधून त्यांनी लहानसहान कामे केली आणि नंतर साहित्य संघाच्या नाट्यशाखेत कार्यरत असताना त्यांनी नाटकांत काम करण्याची मिळालेली संधी सोडली नाही. एकच प्यालातील तळीराम, तुझे आहे तुजपाशी मधील आचार्य, व्यक्ती आणि वल्लीतील अंतू बर्वा आणि हरितात्या या भूमिका त्यांनी संस्मरणीय केल्या. रंगभूमीवरील कलावंतांसाठी आजही दंतकथा असलेले केशवराव दाते, दत्ताराम, मामा पेंडसे यांच्याबरोबर काम करण्याचे भाग्य सावरकर यांना लाभले.

आजच्या आघाडीच्या चंद्रकांत कुलकर्णी, मंगेश कदम आदींच्या दिग्दर्शनाखालीही सावरकरांना रंगमंचावर वावरण्याची संधी मिळाली. सौजन्याची ऐशीतैशी, सूर्यास्त, टिळक आगरकर, ययाति आणि देवयानी, याही नाटकांमधून सावरकरांनी छाप पाडली. सहजता हा त्यांच्या अभिनयाचा स्थायीभाव आहे आणि यातूनच त्यांनी



आपल्या भूमिका आसपास वावरणाऱ्या माणसांसारख्या ओळखीच्या केल्या. अनंत दामले ऊर्फ नूतन पेंढारकर, केशवराव दाते, जयराम शिलेदार, दत्ताराम, दादा साळवी, नानासाहेब फाटक, पंडितराव नगरकर, परशुराम सामंत, बाळ कोल्हटकर, भालचंद्र पेंढारकर, रमेश देव, राजा परांजपे, रामदास कामत, सुरेश हळदणकर, ते आजच्या पिढीतील अद्वैत दादरकर, मंगेश कदम यांच्याबरोबर त्यांनी काम केले आहे. सौजन्याची ऐशीतैशी, सूर्यास्त, टिळक आगरकर, व्यक्ती आणि वल्ली, तुझे आहे तुजपाशी, ययाति आणि देवयानी, एकच प्याला अशा विविधरंगी नाटकांमधून जयंत सावरकर यांनी अतिशय आत्मविश्वासाने काम केले.

जयंत सावरकर यांनी शंभरहून अधिक मराठी आणि तीसहून अधिक हिंदी चित्रपटांत कामे केली आहेत. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार, डॉ. गो. खांडेकर स्मृती पुरस्कार आदी अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. 'एक छोटा माणूस' हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिद्ध झाले आहे. जयंत सावरकर यांना विष्णुदास भावे पुरस्कारही मिळाला होता. जयंत सावरकर हे ९७ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या अध्यक्ष होते. जयंत सावरकर यांचे २४ जुलै २०२३ निधन झाले.

## राजस्थानात कारमध्ये गुदमरून २ अल्पवयीन बहिणींचा मृत्यू

■ जयपूर

**देशभरात** सध्या उष्णतेचा कहर सुरू आहे. अनेक राज्यांमध्ये तापमान चाळीस अंश सेल्सिअसच्या पार गेले आहे. अशा परिस्थितीत राजस्थानच्या अलवरमध्ये कारमध्ये गुदमरून दोन अल्पवयीन बहिणींचा दुदैवी मृत्यू झाला.

टिना (८) आणि लक्ष्मी (५) अशी या बहिणींची नावे आहेत. त्यांना कारमध्ये बसवून त्यांचे पालक खरेदी करण्यासाठी गेले होते. कारचे दरवाजे लॉक करण्यात आले होते. आधीच बाहेरील तापमानाचा पारा चाळीस अंशापार गेला असताना कारच्या आतील तापमान ५३ अंश सेल्सिअसपर्यंत वाढते. या तापमानात गुदमरून या मुलींचा मृत्यू झाला.

## एआय सीसीटीव्ही निगराणीत मुक्त विद्यापीठाची उन्हाळी परीक्षा

■ नाशिक

**यशवंतराव** चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मे/जून २०२६ च्या मुख्य (उन्हाळी) परीक्षा २७ मेपासून सुरू होत आहेत. यंदा प्रथमच ए.आय. आधारित सीसीटीव्ही देखरेख प्रणालीचा प्रायोगिक वापर केला जाणार असून, परीक्षा पारदर्शक आणि गैरप्रकारमुक्त ठेवण्याचा उद्देश आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या नियोजनानुसार ही प्रणाली राबवली जाणार आहे. राज्यातील ५५८ परीक्षा केंद्रांवर प्रश्नपत्रिका डाउनलोडिंग व उत्तरपत्रिका सीलिंग कक्षात सीसीटीव्ही बसवण्यात येणार आहेत. त्यापैकी ८४ निवडक केंद्रांवरील वर्गखोल्यांमध्येही ए.आय. कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली परीक्षा होणार आहे. मुंबई, नागपूर, नांदेड, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, पुणे आणि नाशिक येथील विभागीय केंद्रांमधून नियंत्रण ठेवले जाणार असून, नाशिक मुख्यालयातूनही थेट देखरेख केली जाईल. या प्रणालीमुळे संशयास्पद हालचाली त्वरित लक्षात येणार असून, संपूर्ण परीक्षा प्रक्रिया रेकॉर्ड होणार आहे. त्रिस्तरीय तांत्रिक सुरक्षेमुळे गैरप्रकारांना आळा बसण्यास मदत होणार असल्याचे प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे यांनी स्पष्ट केले.

## शिराळा तालुक्यातील २२ पाझर तलाव पूर्णपणे कोरडे

■ शिराळा



**सांगली** जिल्ह्यातील शिराळा तालुक्यात तीव्र उन्हामुळे पाणीटंचाई गंभीर झाली आहे. तालुक्यातील ४९ पाझर तलावांपैकी २२ तलाव पूर्णपणे कोरडे पडले आहेत. उर्वरित तलावांतील पाणीसाठाही ३० टक्क्यांपेक्षा कमी झाला आहे. प्रामुख्याने निगडी, बेलदारवाडी, कोंडाईवाडी आणि शिरशी परिसरातील पाझर तलावांची स्थिती अत्यंत गंभीर आहे.

या तालुक्यात दरवर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असला तरी एप्रिल-मे महिन्यात वाढत्या तापमानामुळे तलावांतील पाण्याची पातळी वेगाने घटते. अनेक गावांमध्ये शेतीला, जनावरांना आणि पिण्याच्या पाण्यासाठी या तलावांवर अवलंबून राहावे लागते. पाझर तलाव कोरडे पडल्याने ग्रामीण भागात चिंता व्यक्त होत आहे. काही तलावांमध्ये अद्याप समाधानकारक पाणीसाठा असला तरी बहुतांश ठिकाणी परिस्थिती गंभीर आहे. पाण्याचा काटकसरीने वापर, पाणी अडवा-पाणी जिरवा मोहिमा, गाळ काढणे आणि जलसंधारणाच्या उपाययोजना राबविण्याची गरज आहे. ताज्या अहवालानुसार, ० ते २५ टक्के पाणीसाठा असलेले ४ तलाव, २६ ते ५० टक्के पाणीसाठा असलेले २१ तलाव,५१ ते ७५ टक्के पाणीसाठा असलेला १ तलाव, तर ७५ ते १०० टक्के पाणीसाठा असलेला केवळ १ तलाव आहे. बहुतांश तलाव मृतसंचयाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## पावसाळ्यात मोरा-भाऊचा धक्का प्रवास २५ रुपयांनी महागणार

■ उरण

**मोरा-भाऊचा** धक्का या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक २६ मेपासून महागणार असून पावसाळी हंगामासाठी तिकीट दरात २५ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे सध्या ८० रुपये असलेले पूर्ण तिकीट आता १०५ रुपयांपर्यंत वाढणार आहे. तसेच, हाफ तिकीट दर ३९ रुपयांवरून ५२.५० रुपयांपर्यंत करण्यात आले आहेत. ही दरवाढ २६ मे ते ३१ ऑगस्ट या कालावधीपुरती लागू राहणार आहे. मुंबई जलवाहतूक औद्योगिक सहकारी संस्थेचे सचिव शराफत मुकादम यांनी याबाबत माहिती दिली. तसेच, या दरवाढीस मेरिटाईम बोर्डाची मंजुरी मिळाल्याचे भाऊचा धक्का बंदर निरीक्षक सुशील साटेलकर यांनी सांगितले. पावसाळी हंगामामुळे भाऊचा धक्का-रेवस सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक ३१ ऑगस्टपर्यंत बंद ठेवण्यात येणार आहे.



लोक कल्याण ग्राहक संरक्षण संस्था यांच्या वतीने सामाजिक कार्यात उल्लेखनीय योगदान लक्षात घेऊन रमेश गुडेकर यांची मुंबई महानगर उपाध्यक्षपदावर तसेच ठाणे, पालघर व रायगड जिल्हा संपर्कप्रमुख या महत्त्वाच्या पदावर नियुक्ती करण्यात आली. संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिनकर आमकर यांच्या हस्ते नुकतेच त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी संस्थेच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रद्धा सुर्वे, मागासवर्गीय अध्यक्ष बाबाजी नन्नवरे, मुंबई अध्यक्ष पांडुरंग सकटे व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## नागपूरमध्ये उबाठाचे 'मेलोडी चॉकलेट' आंदोलन

■ नागपूर

**नागपूरमधील** व्हेरायटी चौक परिसरात आज उबाठा कार्यकर्त्यांनी महागाईविरोधात अनोखे आंदोलन केले. या आंदोलनात कार्यकर्त्यांनी सिग्नलवर थांबलेल्या नागरिकांना 'मेलोडी' चॉकलेटचे वाटप करत सरकारच्या धोरणांविरोधात निषेध नोंदवला. या आंदोलनात गॅस सिलिंडरच्या दरवाढीपासून ते पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किमतींपर्यंत विविध मुद्दे मांडण्यात आले. कार्यकर्त्यांनी हातात महागाई दर्शवणारे फलक, तसेच गॅस सिलिंडरचे प्रतिकात्मक पोस्टर घेऊन निषेध व्यक्त केला. आंदोलक म्हणाले की, सध्या घरगुती गॅस सिलिंडरची टंचाई आणि इंधनाच्या वाढत्या किमतींमुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि मध्यमवर्गीय मोठ्या अडचणीत आहेत.

## नाशिकमध्ये आज पाणीपुरवठा बंद मुख्य जलवाहिनीला गळती

■ नाशिक

**नाशिक** शहरातील काही भागांमध्ये उद्या पुन्हा पाणीपुरवठा बंद राहणार असल्याने नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागणार आहे. सातपूर आणि नाशिक पश्चिम विभागातील अनेक भागांमध्ये पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार असून, रविवारी सकाळचा पाणीपुरवठा कमी दाबाने होणार असल्याची माहिती महापालिकेकडून देण्यात आली आहे.

मोतीवाला कॉलेज रोड परिसरातील ५०० मिमीच्या मुख्य जलवाहिनीला गळती लागल्याने महापालिकेकडून तातडीने दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत. या दुरुस्तीमुळे संबंधित भागातील पाणीपुरवठा विस्कळीत होणार आहे. मुख्य जलवाहिनीला गळती लागल्यामुळे तसेच दुरुस्तीच्या कामांमुळे सातपूर आणि नाशिक पश्चिम विभागात पाणी कपात किंवा पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. नागरिकांनी गैरसोय टाळण्यासाठी पाणी जपून वापरावे तसेच आवश्यकतेनुसार पाण्याचा साठा करून ठेवावा, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

## दिल्लीत ३ वर्षीय बालिकेवर अत्याचार सहआरोपी शिक्षिकेला जामीन मंजूर



■ नवी दिल्ली

**दिल्लीत** एका ३ वर्षीय बालिकेवर शाळेत लैंगिक अत्याचार झाल्याप्रकरणी सहआरोपी करण्यात आलेल्या वर्ग शिक्षिकेला न्यायालयाने जामीन मंजूर केला.

या शिक्षिकेचे नाव पीडित बालिकेने तक्रारीमध्ये घेतले नव्हते. तसेच पीडितेच्या शरीरावर किंवा तिच्या गुप्तांगावर कोणत्याही प्रकारच्या जखमांच्या खुणा आढळून आलेल्या नाहीत, असे निरीक्षण न्यायालयाने आरोपी शिक्षिकेला जामीन मंजूर करताना नोंदवले. दिल्लीच्या जनकपुरी परिसरातील एका खासगी शाळेतील पुरुष कर्मचाऱ्याने पीडितेवर लैंगिक अत्याचार केले असा आरोप आहे. याप्रकरणी पीडित मुलीच्या आईने १ मे रोजी पोलिसांत तक्रार नोंदवली. तपासादरम्यान पीडितेचा जबाब नोंदवून घेण्यात आला. तसेच पीडितेची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. आरोपी पुरुष कर्मचाऱ्यावर बालकांचे लैंगिक शोषण प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदवून त्याला अटक करण्यात आली होती. आठवडाभरातच त्याची जामिनावर मुक्तता करण्यात आली आहे. तपासादरम्यान पीडितेच्या आईच्या तक्रारीवरून वर्गशिक्षिकेला सहआरोपी करण्यात आले होते. मात्र वर्गशिक्षिकेने आपल्यावरील आरोप फेटाळून लावले आहे. खटल्याची व्याप्ती वाढवण्यासाठी आपल्याला खोट्या गुन्ह्यात अडकवण्यात आले आहे, असे वर्गशिक्षिकेने न्यायालयात सांगितले.

## दादर ते सिद्धिविनायक मंदिर वातानुकूलित बेस्ट बस सेवा

■ मुंबई

**प्रभादेवी-दादर** येथील प्रसिद्ध श्री सिद्धिविनायक मंदिराला भेट देणाऱ्या भाविकांचा प्रवास बेस्टकडून अगदीच गारेगार होणार आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार बेस्ट प्रशासनाकडून ए- ४५ ही बस 'श्री सिद्धिविनायक फेरी' नावाची एक नवीन वातानुकूलित वर्तुळाकार बस सेवा सुरू केली आहे. ही सेवा उद्या शुक्रवार २३ मे पासून सुरू होत आहे.

सिद्धिविनायक मंदिर ते दादर पश्चिम स्थानकादरम्यान ही बस चालवली जाणार आहे. नव्याने ही बससेवा गणेशभक्तांच्या सेवेमध्ये दाखल झाली आहे. हा मार्ग पोर्तुगीज चर्च, आराम नगर, रवींद्र नाट्य मंदिर, दादर पोलीस स्टेशन, शारदा आश्रम आणि कबुतरखाना आणि पुन्हा दादर स्टेशन असा आहे. ही विशेष बस सेवा भाविक, ज्येष्ठ नागरिक आणि रोज प्रवास करणाऱ्यांसाठी सुरू करण्यात आलेली आहे.

## चंद्रपुरात १३ महिलांवर वाघाचा हल्ला

■ चंद्रपूर

**४ ठार**

**चंद्रपूर** जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाही जंगलात तेंदूपत्ता तोडण्यासाठी गेलेल्या १३ महिलांवर वाघाने हल्ला केला. या हल्ल्यात चार महिलांचा मृत्यू झाला असून काही महिला जखमी झाल्या आहेत. जखमी महिलांवर उपचार सुरू आहेत. गुंजेवाही येथील १३ महिलांचा एक गट आज सकाळी ९ वाजताच्या सुमारास जंगलात तेंदूपत्ता गोळा करण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी वाघाने अचानक हल्ला चढवला. या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे महिलांमध्ये भीती पसरली आणि त्या जीव वाचवण्यासाठी पळू लागल्या. मात्र वाघाने काही महिलांचा पाठलाग करून चार जणींवर झडप घातली.

या घटनेत कवडूबाई मोहुर्ले (४५), अनुबाई मोहुर्ले (४६), संगीता चौधरी (३६) आणि सुनीता कौशिक मोहुर्ले (३३) या चार महिलांचा मृत्यू झाला. घटनेनंतर एका महिलेने गावात धाव घेऊन ग्रामस्थांना माहिती दिली. त्यानंतर गावकरी आणि वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. वनविभागाने परिसरात गस्त वाढवली असून नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

## हत्येच्या आरोपीला पळून लावले वसईच्या ३ पोलिसांना अटक

**पोलिसांनी गुगल पे द्वारे पैसे स्वीकारल्याचे निष्पन्न**

■ वसई

**वसई** न्यायालयाच्या आवारातून पसार झालेल्या आरोपीला ३ पोलिसांनीच पळून जाण्यास मदत केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी तीन पोलिसांना अटक करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे या पोलिसांनी गुगल पे द्वारे पैसे स्वीकारल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. अविनाश उर्फ अजय सोनी (४७) या आरोपीला हत्या प्रकरणात अटक करण्यात आली होती. त्याने २००९ मध्ये विनोद जैस्वाल याची हत्या केली होती. २०२५ मध्ये अटक झाल्यापासून तो ठाणे कारागृहात होता. सोमवार १८ मे रोजी त्याला ठाणे कारागृहातून खटल्याच्या सुनावणीसाठी वसई सत्र न्यायालयात आणण्यात आले होते. न्यायालय परिसरात पोहोचल्यानंतर त्याने शौचालयात जाण्याचा बहाणा केला आणि तो फरार झाला होता. याप्रकरणी बंदोबस्तावर असलेल्या तीन पोलिसांच्या कार्यपध्दतीवर शंका निर्माण झाली होती. आरोपींच्या हातातील बेड्या देखील या पोलिसांनी काढल्या होत्या. तपासात या तिघांनीच त्याला मदत केल्याचे निष्पन्न झाले होते. याप्रकरणी एकनाथ तळपाडे, प्रशांत राठोड आणि वसीम शेख या तीन पोलीस कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. आरोपीला फरार होण्यात मदत करण्यासाठी जी पेच्या माध्यमातून पैशांची देवाणघेवाण झाल्याचा संशय आहे. मागील काही दिवसांत संबंधित पोलिसांच्या मोबाईलमध्ये जी पे व्यवहार आढळले आहेत. या प्रकरणी फरार आरोपी सोनी याची पत्नी साक्षी सोनी आणि मुलगा अतुल सोनी यांनाही अटक करण्यात आली आहे.

## भिवंडीत नालेसफाई काम करताना कामगाराचा मृत्यू

■ भिवंडी

**भिवंडी** महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्रमांक २ अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्रमांक १४ मध्ये सुरू असलेल्या नालेसफाईच्या कामादरम्यान एका कामगाराचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. सुभाष नवशाह दिघे (४४) असे मृत कामगाराचे नाव आहे. गेल्या काही दिवसांपासून संबंधित भागात नालेसफाईचे काम सुरू असून सुभाष दिघे हेदेखील तिथे काम करत होते. दुपारच्या वेळी सर्व कामगार जेवणासाठी गेले होते. त्यानंतर पुन्हा काम सुरू करण्यात आले. त्यावेळी सुभाष दिघे हे सहकाऱ्यांना दिसले नाहीत. यानंतर कामगारांनी परिसरात त्यांचा शोध सुरू केला. त्यावेळी सुभाष दिघे हे नाल्यात बेशुद्धावस्थेत पडलेले आढळले. सहकाऱ्यांनी तातडीने त्यांना बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात नेले. मात्र, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेनंतर नालेसफाईच्या कामांमध्ये कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## काजू उत्पादन कोकणात! निर्यात केंद्र मात्र कोल्हापुरात

■ मुंबई

**राज्यातील** काजू उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र काजू बोर्डाच्या वतीने कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड येथे देशातील पहिली काजू बाजारपेठ उभारण्यात येणार आहे. या संदर्भात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ चंदगड तालुक्यातील हलकर्णी येथे नाममात्र दराने ४० एकर जागा उपलब्ध करून देणार आहे.

म्हणजेच काजूचे उत्पादन होणार कोकणात मात्र त्याचे निर्यात केंद्र कोल्हापुरात असणार आहे.

चंदगड तालुक्यातील हलकर्णी येथे होणाऱ्या या काजू निर्यात काजू मंडळाचे विभागीय कार्यालय, अत्याधुनिक नर्सरी, काजूसाठी सेंटर ऑफ एक्सलन्स, काजू प्रक्रिया प्रकल्प, काजू निर्यात केंद्र, अद्यावत गोदाम तसेच देशातील पहिली काजू बाजार समिती उभारण्यात येणार आहे.विशेष म्हणजे राज्यात सर्वाधिक काजूची लागवड कोकणातील सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या जिल्ह्यात आहे.

**चंदगड तालुक्यामध्ये ४० एकर जागा उपलब्ध**

सिंधुदुर्गात तर काजू लागवडी खालील क्षेत्र ८० हजार हेक्टरच्या पुढे गेले आहे. हापूस आंब्याच्या बरोबरीने काजू हे जिल्ह्यातील महत्त्वाचे नगदी पीक ठरले आहे. त्या तुलनेने कोल्हापूरच्या आजरा, गडहिंग्लज आणि चंदगड या तालुक्यात काही प्रमाणात काजूची लागवड आहे. काजूसारखी परिस्थिती मत्स्यव्यवसायाची झाली आहे.कोकण समुद्र किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणात मासेमारी चालते. मात्र मत्स्य विद्यापीठ कोकणात न होता किनारपट्टीपासून ८०० किलोमीटर अंतरावरील नागपूर येथे सुरू झाले आहे.

## माथेरानमध्ये दोन दिवसांपासून तीव्र पाणीटंचाई! नागरिक त्रस्त

■ माथेरान

**गेल्या** तीन नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील उल्हास नदीवरील पंपिंग व्यवस्थेत वारंवार होणारा बिघाड आणि डिझेलच्या अपुऱ्या उपलब्धतेमुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे.नेरळवरून होणाऱ्या या पाणीपुरवठ्यावर माथेरानची तहान अवलंबून असते.मात्र अशा परिस्थितीत सलग दोन दिवस माथेरानला पाणीपुरवठाच झालेला नाही. त्यामुळे नागरिक आणि पर्यटक त्रस्त झाले आहेत. चुकीच्या क्षमतेचा स्टार्टर बसवल्यामुळे पंप जळत असल्याचा दावा सामाजिक कार्यकर्ते जनार्दन पार्टे यांनी केला आहे.त्यांनी म्हटले की,पुढील १५ ते २० दिवस पर्यटकांची मोठी गर्दी अपेक्षित असताना पाणीपुरवठा कोलमडल्याने पर्यटन व्यावसायिकांची चिंता वाढली आहे.

## पुण्यातील मेट्रो कामामुळे बीआरटी मार्ग बंद होणार

■ पुणे

**शहरातील** स्वारगेट ते कात्रजदरम्यान सुरू असलेल्या मेट्रो मार्गिकेच्या कामामुळे शहरातील सुमारे सहा किलोमीटरचा अखेरचा बीआरटी मार्गही बंद होण्याच्या मार्गावर आहे. २००६ मध्ये देशात सर्वप्रथम पुण्यात सुरू करण्यात आलेल्या या बीआरटी प्रयोगाची अखेर होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.



शहरातील जलद बस वाहतुकीसाठी बोगोटा शहराच्या धर्तीवर बीआरटी प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार सातारा रस्त्यावर स्वारगेट ते कात्रज हा पहिला डेडीकेटेड लेन असलेला बीआरटी मार्ग विकसित करण्यात आला. रस्त्याच्या मध्यभागी बंदिस्त मार्गिका, स्वतंत्र बसथांबे आणि दोन्ही बाजूंनी दरवाजे उघडणाऱ्या बसच्या सुविधेसह हा मार्ग सुरू झाल्यानंतर त्यावर झालेल्या ५० हून अधिक जीवघेण्या अपघातांमुळे हा प्रकल्प चर्चेत आला होता. या मार्गानंतर सोलापूर रस्ता, नगर रस्ता, तसेच पिंपरी-चिंचवड परिसरातही टप्प्याटप्प्याने बीआरटी मार्ग विकसित करण्यात आले. किमान १३ ठिकाणी बीआरटी रस्ते उभारले होते. मात्र, बीआरटी मार्गांवर इतर वाहनांची घुसखोरी आणि अन्य अनेक कारणांमुळे या प्रकल्पाला अल्पावधीतच घरघर लागली. त्यानंतर टप्प्याटप्प्याने अनेक बीआरटी मार्ग बंद करण्यात आले.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# पुलवामाच्या मास्टरमाईंडचा खातमा

भारताच्या दहशतवादी लढ्याचा निर्णायक परिणाम म्हणजे सर्जिकल स्ट्राईक होता. पुलवामा हल्ल्यानंतर भारताने हा स्ट्राईक केला. कारण या पाकिस्तानमध्ये दहशतवाद पोसला जातो. ती ठिकाणं उद्ध्वस्त करणे म्हणजेच काश्मीरमध्ये चालणारा हिंसाचार संपुष्टात आणण्याचा तो एक पर्याय होता. पुलवामा हल्ला झाला त्यावेळेला लष्कराच्या चाळीस जवानांना हौतात्म्य पत्करावे लागले ही गोष्ट भारताच्या सहनशिलतेचा अंत पाहणारी होती. त्यानंतर भारताने पाकिस्तानविरुद्ध निर्णायक लढा पुकारला. मात्र या पुलवामा हल्ल्यातला जो मास्टरमाईंड होता त्याचा खातमा होऊ शकलेला नव्हता. त्याचे नाव हमजा बुरहान असे जरी असले तरी त्याचे खरे मूळ नाव अर्जुमंद गुलजार दार असे होते. तो पुलवामा जिल्ह्यातल्या खरबतपोरा गावचा राहणारा होता. पुलवामा हल्ला घडवून तो पाकव्याप्त काश्मीरमध्ये पळाला होता. भारतीय सुरक्षा यंत्रणांनी त्याचा शोध जारी ठेवला होता. तो पाकिस्तान किंवा पाकव्याप्त काश्मिरमध्ये आहे याबद्दलची माहिती मिळाली होती. आणि पाकव्याप्त काश्मीरच्या मुझफ्फराबादमध्ये राहत होता. त्याच ठिकाणी अज्ञात हल्लेखोरांनी त्याची हत्या केली. हे हल्लेखोर कोण होते. याचा सुगावा जरी लागलेला नसला तरी पाकव्याप्त काश्मीरमध्ये काही गटातल्या अंतर्गत संघर्षातून ही हत्या झाल्याचेही सांगितले जाते आहे. कारण तो अलबद्र नावाच्या दहशतवादी संघटनेशी संबंधित होता. गेल्या दोन तीन वर्षांपासून पाकिस्तानात काही दहशतवादी संघटनांमध्ये आपापसात संघर्ष सुरू आहे. त्याला जाणीवपूर्वक पाकिस्तानने मुझफ्फराबादमधल्या एका शाळेमध्ये प्रिन्सिपॉल म्हणून नियुक्त केले विशेष म्हणजे त्याला सुरक्षादेखील पुरवली गेली होती. याचा अर्थ पाकिस्तानच्या छत्रछायेखाली पाकव्याप्त काश्मीरमध्ये वावरत होता. मधल्या काळात सुरक्षा काढली गेली. आणि त्याची हत्या झाल्याची बातमी पसरली. मात्र आश्चर्याची गोष्ट अशी की, पाकिस्तानकडूनच हमजा जिवंत असल्याचाही दावा केला जातो आहे. या सगळ्या प्रकाराचा सरकारकडून अधिकृत खुलासा झालेला नाही.

### पाकिस्तानने पोसलेले दहशतवादी

आज जरी पाकिस्तानने हमजा जिवंत असल्याचे म्हटले असले तरी त्यावरही विश्वास ठेवण्यासारखी परिस्थिती राहिलेली नाही. ज्यावेळेला पुलवामा हल्ला झाला त्यावेळी एका चित्रफितीतून या हमजाने हल्ल्याची जबाबदारी तर घेतली होतीच. शिवाय ती चित्रफित तुमच्या हाती लागेल त्यावेळेला मी स्वर्गवासी झालेलो असेल अशा प्रकारचा उल्लेख केला होता. परंतु तो पाकिस्तानात पळून जाण्यात यशस्वी झाला. २०२२ नंतर तो पाकव्याप्त काश्मीरमध्ये राहू लागला होता. तिथे बसूनही अलबद्रचा कमांडर म्हणून तो सूत्र हलवत होता. विशेषतः काश्मीरमधल्या तरुणांना दहशतवादी कारवायांसाठी प्रवृत्त करायचे. त्यांना दहशतवादी प्रशिक्षणासाठी तयार करायचे. यासाठी लागणारा पैसाही पुरवायचा. अशा प्रकारचे त्याचे उद्योग सुरू होते. गेल्या वर्षभरात काश्मीरमध्ये ज्या काही दहशतवादी घटना घडल्या त्यातील काहींशी हमजाचा संबंध असल्याचा संशय सुरक्षा यंत्रणांनी व्यक्त केला होता. पुलवामा हल्ल्यानंतर भारताने केलेला सर्जिकल स्ट्राईक हा तिथल्या सगळ्या दहशतवादी संघटनांवरचा जबरदस्त प्रहार ठरला होता. भारताने पाकिस्तानला यासंदर्भात कडक इशारा देऊन तिथे लपलेल्या दहशतवाद्यांना संपवण्याचे प्रयत्न चालू ठेवले होते. विशेष म्हणजे गेल्या दोन वर्षांत पाकिस्तानमध्येसुद्धा शिया सुन्नी या गटांमधल्या हाणामाऱ्या, मशिदींमधले बॉम्बस्फोट हे प्रकार सुरूच होते. आपापसातील वैमनस्यातून पाकिस्तानात बसून कारवाया करणाऱ्या परंतु लष्कर-ए-तोयब्बा, हिजमुल मुजाहिदीन, जैश-ए-मोहम्मद, अलबद्र, यांच्यामध्येसुद्धा आपापसात हल्ले किंवा हत्या यांची शृंखला सुरू होती. गेल्याच महिन्यात लष्कर-ए-तोयब्बाचा संस्थापक आमिर हमजाची लाहोरमध्ये हत्या केली गेली. त्यापूर्वी मार्च महिन्यात जैश-ए-मोहम्मदचा प्रमुख मसूद अजहरच्या मोठ्या भावाची मोहम्मद ताहिर याची अशाच प्रकारे हत्या झाली होती. मुंबईच्या २६-११ चा सूत्रधार असलेल्या हाफिज सैदचा साथीदार अबू कताल यालाही पाकिस्तानातल्या सिंध भागामध्ये ठार केले गेले होते. म्हणजे दहशतवाद्यांची ठिकाणे उद्ध्वस्त झाल्यानंतर त्यांच्या अनेक म्होरक्यांना संपवले गेल्याचे दिसून येते. याच शृंखलेतलाच हा प्रकार ठरतो.

### ऑपरेशन सिंदूर सुरूच राहील

भारतात गेल्या तीस-चाळीस वर्षांपासून पाकिस्तानपुरस्कृत दहशतवाद थैमान घालत होता. परंतु सरकारच्या बोटचेपे धोरणावर पाकिस्तानला धडा शिकवण्याचे काम होऊ शकले नाही. ऊरी, पठाणकोट, आणि पुलवामा या लष्करी तळांवर एकापाठोपाठ हल्ले झाले. त्यावेळी भारताने थेट पाकिस्तानात घुसून या दहशतवादाचे कंबरडे मोडण्यात यश मिळवले. जवळजवळ सहा वर्षानंतर का होईना परंतु पुलवामा हल्ल्यासाठी शस्त्र पुरवणाऱ्या या मुख्य सूत्रधाराची हत्या होणं ही भारतासाठी अतिशय महत्त्वाची बाब ठरते. ज्या पद्धतीने पाकिस्तानातल्या दहशतवादी संघटनांना सगळ्या प्रकारची मदत करून भारतात हल्ले घडवले जात होते. आता त्याच दहशतवाद्यांना पाकिस्तानातच अशा प्रकारच्या हत्यासत्राला सामोरे जावे लागत आहे. काहीबाबतीत काळच कसा सूड घेतो हे यातून सिद्ध होते. अजूनही भारतावरचे दहशतवादाचे संकट पूर्णपणे नाहीसे झालेले नाही. हे गेल्या वर्षीच्या पहलगाम हल्ल्याने पुन्हा दाखवून दिले आहे. याचा अर्थ जोपर्यंत पाकिस्तान या दहशतवाद्यांचे भरण पोषण थांबवत नाही. तोपर्यंत हा लढा चालूच ठेवावा लागणार आहे. म्हणूनच पहलगाम हल्ल्यानंतरच्या ऑपरेशन सिंदूर यापुढेही चालू राहील. असे पंतप्रधानांनी म्हटले होते. कारण निष्पाप पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून गोळ्या घालण्याचा क्रूरपणा केला गेला. याचा हिशेब त्याच पद्धतीने पूर्ण करावा लागेल. ऑपरेशन सिंदूर प्रदीर्घ काळ चालू ठेवण्याशिवाय पर्याय राहत नाही. कारण हमजासारखे असे अनेक हरामखोर याच पाकिस्तानने अजूनही लपवून ठेवलेले आहेत.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

स्वतःच्या फायद्यासाठी जे तुमच्याजवळ येतात,
ते कधीच तुमचे नसतात.
त्यांची गरज संपली की ते नातेसुद्धा संपवतात.

## पंचांग



**शनिवार, २३ मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** अधिक ज्येष्ठ शुक्ल अष्टमी**
*** नक्षत्र : मघा**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ०२-०७ कर्क**
**०२-०८ ते २४-०० सिंह**

**रवी उदय- ०६-०३**
**रवी अस्त- १९-०८**

**दुर्गाष्टमी, सायं. पश्चिमेस बुध दर्शन**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




अधिक महिना स्पेशल



### झटपट अनारसे

★ **साहित्य :** तांदळाचे पीठः १ कप (बारीक दळलेले) गूळः १/२ कप (बारीक किसलेला किंवा चिरलेला), दहीः २ ते ३ चमचे किंवा केळीचा गर ३-४ चमचे, खसखसः आवश्यकतेनुसार, तूप किंवा तेल- तळण्यासाठी.

★ **कृती :** एका बाऊलमध्ये तांदळाचे पीठ आणि किसलेला गूळ एकत्र करा. आता त्यात दही किंवा केळीचा गर घाला आणि मिश्रण चांगले मळून घ्या. पिठाचा घट्ट गोळा तयार करा. जर पीठ जास्त कोरडे वाटल्यास, पाण्याचा किंवा दुधाचा हलकासा हबका मारा. हे पीठ साधारण १ ते २ तास मुरण्यासाठी झाकून ठेवा. आता पिठाचे छोटे गोळे घ्या. एका प्लेटमध्ये खसखस पसरा. गोळ्याला बोटांना थोडे तूप लावून खसखसवर पुरीसारखे हलके थापा. कढईत तूप किंवा तेल मध्यम आचेवर गरम करा. अनारसा खसखस असलेली बाजू वर करून तेलात सोडा. अनारसावर गरम तेल शिंपडा, ज्यामुळे त्यावर छान जाळी पडेल. खालून सोनेरी झाल्यावर अनारसा अलगद उलटवून दुसरीकडून तळा. अनारसा जास्त लाल होऊ देऊ नका. कारण बाहेर काढल्यावरही त्याची तळण्याची प्रक्रिया सुरू असते.



## क्रीडा

# प्लेऑफच्या शर्यतीत टिकण्यासाठी पंजाबला लखनौचा अडथळा पार करावा लागणार

**सलग सहा पराभवांमुळे प्लेऑफच्या शर्यतीत पिछाडीवर पडलेल्या पंजाब किंग्स संघासमोर आता 'करो या मरो'ची परिस्थिती निर्माण झाली आहे. आयपीएल २०२६ मधील महत्त्वाच्या सामन्यात पंजाबचा सामना लखनौ सुपर जायन्टस विरुद्ध लखनौच्या भारतरत्न श्री अटल बिहारी वाजपेयी एकना क्रिकेट स्टेडियम येथे होणार असून, प्लेऑफच्या आशा कायम ठेवण्यासाठी श्रेयस अय्यरच्या संघाला कोणत्याही परिस्थितीत विजय मिळवावा लागणार आहे. दुसरीकडे, स्पर्धेतून जवळपास बाहेर पडलेल्या लखनौचा संघ घरच्या मैदानावर हंगामाचा शेवट विजयाने करण्यासाठी मैदानात उतरणार आहे.**



■ लखनौ

पंजाब किंग्सने या हंगामाची सुरुवात दमदार केली होती. सात सामन्यांपैकी सहा विजय मिळवत त्यांनी गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले होते. मात्र त्यानंतर संघाची कामगिरी अचानक घसरली. फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही विभागांत सातत्याचा अभाव आला आणि संघाला सलग सहा सामन्यांत पराभव पत्करावा लागला. त्यामुळे आता त्यांचे प्लेऑफचे गणित अधिकच गुंतागुंतीचे झाले आहे. पंजाबला उर्वरित सामना जिंकण्याबरोबरच इतर संघांच्या निकालांवरही अवलंबून राहावे लागणार आहे. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील पंजाब संघासाठी प्रियांश आर्या आणि कूपर कॉनोली हे प्रमुख फलंदाज ठरले आहेत. आक्रमक फलंदाजी करत दोघांनी अनेक सामन्यांत संघाला मजबूत सुरुवात करून दिली आहे. प्रभसिमरन सिंग आणि शशांक सिंग यांच्याकडूनही मधल्या फळीत महत्त्वपूर्ण योगदानाची अपेक्षा असेल. गोलंदाजीत अर्शदीप सिंग, लॉकी फर्ग्युसन आणि युझवेंद्र चहल यांच्यावर मोठी जबाबदारी असेल.

दुसरीकडे, ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील लखनौ सुपर जायंट्सचा हंगाम निराशाजनक ठरला आहे. १३ सामन्यांत केवळ चार विजय मिळवत संघ गुणतालिकेत तळाशी आहे. मागील सामन्यात राजस्थान रॉयल्सविरुद्ध २२१ धावांचे मोठे लक्ष्य बचावण्यात अपयश आल्याने त्यांच्या गोलंदाजीतील त्रुटी पुन्हा एकदा समोर आल्या. मात्र निकोलस पूरन, मिचेल मार्श आणि आयुष बडोनी यांनी फलंदाजीत काहीवेळा चमकदार कामगिरी केली आहे. या दोन संघांमधील यंदाच्या पहिल्या सामन्यात पंजाबने वर्चस्व गाजवले होते. मुल्लानपूर येथे झालेल्या त्या लढतीत पंजाबने ५४ धावांनी मोठा विजय मिळवला होता. प्रियांश आर्या आणि कूपर कॉनोली यांनी दुसऱ्या विकेटसाठी १८२ धावांची भागीदारी रचत पंजाबला २५४ धावांचा भक्कम डोंगर उभा करून दिला होता. प्रत्युत्तरात लखनौला २०० धावांपर्यंतच मजल मारता आली होती.

## टेनिस कोर्टवर लक्झरी ब्रँड्समध्ये स्टार्ससाठी स्पर्धा

■ न्यूयॉर्क

**जागतिक** टेनिसमध्ये आता केवळ खेळाचीच नव्हे, तर फॅशन आणि ग्लॅमरचीही जोरदार चर्चा सुरू आहे. वाढती प्रेक्षकसंख्या आणि तरुण चाहत्यांचा ओढा लक्षात घेता अनेक लक्झरी फॅशन ब्रँड्स टेनिस स्टार्सना करारबद्ध करण्यासाठी स्पर्धा करत आहेत. त्यामुळे टेनिस कोर्ट आता हळूहळू फॅशन रनवेचे रूप घेत असल्याचे चित्र दिसत आहे.

जगातील अव्वल महिला टेनिसपटू आर्यना सबालेंका इटालियन ओपनदरम्यान गुच्चीची नव्याने लाँच झालेली 'पापरात्सो' बॅग घेऊन कोर्टवर दिसली आणि त्यानंतर मोठी चर्चा रंगली. गुच्चीने यावर्षी सबालेंकाला ब्रँड ॲम्बेसेडर केले आहे. याआधी गुच्चीनेयानिक सिनर यालाही करारबद्ध केले होते.

इतर मोठे ब्रँड्सही आता टेनिसपटूंवर मोठी गुंतवणूक करत आहेत. लुई व्हिटॉनने कार्लोस अल्काराझला, तर डिओरने झेंग चिनवेन हिला आपल्या मोहिमेशी जोडले आहे.

## १००० रु. तयारी कशी करायची? पाकिस्तानच्या हॉकीपटूंचा सवाल

■ लाहोर

**पाकिस्तान** हॉकी संघ सध्या एफआयएच प्रो लीग आणि आगामी विश्वचषकाच्या तयारीत व्यस्त आहे. मात्र मैदानावरील तयारीपेक्षा संघाच्या आर्थिक अडचणींचीच जास्त चर्चा सुरू आहे. खेळाडूंना मानधन आणि भत्ते वेळेवर मिळत नसल्याने त्यांनी पाकिस्तान हॉकी फेडरेशन विरोधात नाराजी व्यक्त केली आहे.

पाकिस्तान हॉकी फेडरेशनने परदेश दौऱ्यांसाठी खेळाडूंना दररोज ११० अमेरिकन डॉलर्स देण्याची घोषणा केली. पण खेळाडूंचे म्हणणे आहे की, आधीचे पैसेच अद्याप मिळालेले नाहीत. त्यामुळे नव्या आश्वासनांवर त्यांचा विश्वास नाही.

याशिवाय प्रशिक्षण शिबिरादरम्यान दिला जाणारा दैनिक भत्ता ३००० पाकिस्तानी रुपयांवरून थेट १००० रुपयांपर्यंत कमी करण्यात आला आहे. यामुळे खेळाडूंमध्ये संतापाचे वातावरण आहे. एवढ्या कमी रकमेत सराव, आहार आणि इतर खर्च भागवणे कठीण असल्याचे त्यांनी सांगितले.

## सुनील गावस्कर-जेमिमा रॉड्रिग्सचे जॅमिंग सेशन चर्चेत

■ मुंबई



**क्रिकेटपटू** सुनील गावस्कर आणि जेमिमा रॉड्रिग्स यांची जोडी पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. टी-२० विश्वचषक २०२६ पूर्वी दोघांचा एक नवीन इन्स्टाग्राम रील व्हायरल झाली. त्यामध्ये ते गिटार वाजवत गाणे गात आहेत.

ही मैत्री २०२५ महिला वनडे विश्वचषकादरम्यान चर्चेत आली होती. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य फेरीत जेमिमाने नाबाद १२७ धावांची शानदार खेळी करत भारताला ऐतिहासिक विजय मिळवून दिला होता. त्या सामन्यानंतर समालोचन करत असलेल्या गावस्कर यांनी गंमतीत जेमिमाला सांगितले होते की, भारताने विश्वचषक जिंकल्यास ते तिच्यासोबत गाणे गातील.

यानंतर भारताने अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा पराभव करत पहिले महिला वनडे विश्वचषक विजेतेपद पटकावले आणि गावस्कर यांनी दिलेले वचन पूर्ण केले. त्यांनी क्रिकेट बॅटच्या आकाराची खास गिटार आणली होती, ज्याला सोशल मीडियावर बॅट-आर असे नाव मिळाले. त्यानंतर दोघांनी मिळून 'ये दोस्ती' हे गाणे गात एक रील बनवली होती, जी चाहत्यांना खूप आवडली. आता पुन्हा एकदा गावस्कर आणि जेमिमा एका नव्या रीलमध्ये एकत्र आले आहेत. जेमिमाने हा व्हिडिओ शेअर करत गावस्कर यांचे आभार मानले आणि त्यांना खरे दिग्गज असे म्हटले आहे.

## आम्ही मोहोळ आहोत तुला बघून घेऊ! महेंद्र गायकवाडला धमकी

■ सातारा

**साताऱ्यात** पार पडलेल्या ५२ व्या हिंद केसरी स्पर्धेच्या अंतिम लढतीनंतर निर्माण झालेला वाद आणखी चिघळला आहे. अंतिम सामन्यात महेंद्र गायकवाड विरुद्धच्या कुस्तीत दुखापत झाल्यानंतर पृथ्वीराज मोहोळ याने जाणूनबुजून इजा केल्याचा आरोप केला होता. आता या आरोपांना प्रत्युत्तर देताना महेंद्र गायकवाडने धक्कादायक खुलासा केला. आम्ही मोहोळ आहोत, तुला बघून घेऊ... तू कुस्ती कशी करतो ते आम्ही पाहतोच अशी धमकी मिळाल्याचा दावा गायकवाडने केला आहे.

साताऱ्यात झालेल्या हिंद केसरी स्पर्धेच्या अंतिम लढतीत पृथ्वीराज मोहोळ दुखापतग्रस्त झाला. हाताला गंभीर दुखापत झाल्याने त्याला सामना अर्धवट सोडावा लागला. त्यानंतर सोलापूरच्या महेंद्र गायकवाडने मानाची हिंद केसरी गदा आणि थार गाडी जिंकली. मात्र या सामन्यानंतर सोशल मीडियावर मोठा वाद निर्माण झाला.

पृथ्वीराज मोहोळने व्हिडिओ शेअर करत महेंद्र गायकवाडने जाणूनबुजून दुखापत केल्याचा आरोप केला होता. यावर प्रतिक्रिया देताना गायकवाडने सर्व आरोप फेटाळले आहेत. एका मुलाखतीत बोलताना तो म्हणाला, जर मला पृथ्वीराजला इजा करायचीच असती, तर पहिल्याच ॲक्शनमध्ये काहीतरी केले असते.

## राष्ट्रीय पॅरा-आर्चरी प्रशिक्षक वेदवानला पोक्सोअंतर्गत शिक्षा

■ नवी दिल्ली

**अल्पवयीन** खेळाडूच्या लैंगिक छळप्रकरणी राष्ट्रीय पॅरा-तिरंदाजी प्रशिक्षक कुलदीप वेदवानला सोनीपत येथील विशेष जलदगती न्यायालयाने पोक्सो कायद्यान्वये पाच वर्षांच्या सक्त कारावासाची शिक्षा सुनावली आहे. न्यायालयाने त्यांच्यावर १५ हजार रुपयांचा दंडही ठोठावला असून शिक्षा जाहीर होताच त्यांना पुन्हा ताब्यात घेण्यात आले.

सोनीपत न्यायालयाने वेदवानला दोषी ठरवले होते. त्यानंतर शिक्षेची सुनावणी करताना न्यायालयाने पोक्सो कायद्याच्या कलम १० अंतर्गत पाच वर्षे आणि कलम १२ अंतर्गत तीन वर्षांची शिक्षा सुनावली. मात्र दोन्ही शिक्षा एकाच वेळी भोगाव्या लागणार असल्याने त्यांना एकूण पाच वर्षांचा कारावास भोगावा लागेल. एप्रिल २०२३ मध्ये एका अल्पवयीन महिला तिरंदाजाने कुलदीप वेदवान यांच्यावर लैंगिक छळाचे आरोप केले होते.

## अश्मिताचा शानदार प्रवास थांबला! डेन्मार्कच्या लाईन होयमार्ककडून पराभव



■ क्वालालंपूर

**अश्मिता** चालिहा हिचा मलेशिया मास्टर्स स्पर्धेतील शानदार प्रवास अखेर उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आला. महिला एकेरीच्या लढतीत भारताच्या या युवा बॅडमिंटनपटूला डेन्मार्कच्या लाइन होयमार्क क्येर्सफेल्ट हिच्याकडून २३-२१, १८-२१, ११-२१ असा पराभव स्वीकारावा लागला.

जागतिक क्रमवारीत ७१ व्या स्थानावर असलेल्या अश्मिताने संपूर्ण स्पर्धेत दमदार खेळ करत उपांत्यपूर्व फेरी गाठली होती. दुखापतीतून पुनरागमन केल्यानंतर तिची ही कामगिरी विशेष मानली जात आहे.

दुसरीकडे, जागतिक क्रमवारीत २३ व्या स्थानावर असलेल्या आणि स्पर्धेत आठवे मानांकन मिळालेल्या लाइन क्येर्सफेल्डविरुद्ध अश्मिताने कडवी झुंज दिली. सामन्याच्या सुरुवातीपासूनच अश्मिताने आक्रमक खेळ दाखवला. पहिल्या गेममध्ये तिने मध्यंतरापर्यंत ११-६ अशी आघाडी घेत प्रतिस्पर्धी खेळाडूवर दबाव निर्माण केला. त्यानंतर लाइनने पुनरागमन करत १९-१८ अशी आघाडी घेतली. मात्र अश्मिताने शांतता आणि संयम राखत निर्णायक गुण जिंकले आणि २३-२१ असा पहिला गेम आपल्या नावावर केला.

# १० राज्यांतील २४ राज्यसभेच्या जागांसाठी १८ जूनला मतदान

नवी दिल्ली

**केंद्रीय** निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील रिक्त झालेल्या एका राज्यसभा जागेसह देशातील १० राज्यांमधील एकूण



२४ राज्यसभा जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. या सर्व जागांसाठी १८ जून रोजी मतदान होणार असून त्याच दिवशी मतमोजणीही पार पडणार आहे. महाराष्ट्रातील राज्यसभा जागा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत विजय मिळवून आमदारकी स्वीकारल्यानंतर रिक्त झाली होती. आंध्र प्रदेश आणि गुजरातमध्ये प्रत्येकी चार, कर्नाटकमध्ये चार, मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये प्रत्येकी तीन, झारखंडमध्ये दोन, तर मणिपूर, मेघालय, अरुणाचल प्रदेश आणि मिझोराममध्ये प्रत्येकी एका जागेसाठी निवडणूक होणार आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, संबंधित राज्यांतील विद्यमान राज्यसभा खासदारांचा कार्यकाळ २१ जून ते १९ जुलैदरम्यान संपत असल्याने या जागा रिक्त होत आहेत. अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ८ जून निश्चित करण्यात आली आहे.

# अमरनाथ यात्रा ३ जुलैपासून सुरू

श्रीनगर

**या** वर्षीच्या अमरनाथ यात्रेसाठी आतापर्यंत ३.६ लाखांहून अधिक भाविकांनी नोंदणी केली आहे. ३ जुलैपासून बालटाल-सोनमर्ग आणि पारंपरिक नुनवान-पहलगाम मार्गाने ही यात्रा सुरू होणार असून ती २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाच्या दिवशी समाप्त होईल.

दरम्यान, यात्रा मार्गावर अजूनही १० ते १२ फूट बर्फ साचलेला असून सीमा रस्ते संघटना दोन्ही मार्गांवर वेगाने बर्फ हटवणे आणि दुरुस्तीचे काम करत आहे. १५ जूनपर्यंत दोन्ही मार्ग पूर्णपणे तयार होतील, असा अधिकाऱ्यांचा दावा आहे. या वर्षी यात्रेकरूंसाठी बेस कॅम्पवर तंबूऐवजी प्री-फॅब्रिकेटेड आणि फायबर स्ट्रक्चर उभारण्यात येत आहेत, ज्यात आधुनिक सुविधा उपलब्ध असतील. धोकादायक आणि संवेदनशील भागांना 'नो-एंट्री झोन' घोषित करण्यात आले आहे.

देश विदेश

# १९९६ मध्ये दोन विमाने पाडली क्युबाचा माजी राष्ट्राध्यक्षांवर गुन्हा



वॉशिंग्टन

**अमेरिकेने** क्युबाचे माजी राष्ट्राध्यक्ष राउल कॅस्ट्रो यांच्यावर १९९६ मध्ये दोन विमाने पाडल्याप्रकरणी गंभीर गुन्हे दाखल केले आहेत. या घटनेत चार जणांचा मृत्यू झाला होता, त्यापैकी तीन जण अमेरिकन नागरिक होते. अमेरिकेच्या न्याय विभागाने ही कारवाई अमेरिकन नागरिकांच्या हत्येच्या आरोपांवरून केली आहे. मियामी येथे कार्यवाहक टर्नी जनरल टॉड ब्लांश यांनी राउल कॅस्ट्रो आणि आणखी पाच जणांविरुद्ध आरोप जाहीर केले. १९९६ मध्ये राउल कॅस्ट्रो क्युबाच्या लष्कराचे प्रमुख होते. अमेरिकेने त्यांच्यावर हत्येचा कट रचणे, विमान पाडणे आणि चार हत्यांचे आरोप ठेवले आहेत.

या गुन्ह्यांमध्ये दोषी आढळल्यास जन्मठेप किंवा मृत्यूदंडाची शिक्षा होऊ शकते. मात्र क्युबाचे राष्ट्राध्यक्ष मिगेल डियाझ-कॅनेल यांनी हे आरोप राजकीय असल्याचा दावा केला आहे. क्युबाने त्यावेळी आत्मसंरक्षणासाठी कारवाई केली होती, असे त्यांनी म्हटले. अमेरिकेने क्युबावर राजकीय आणि आर्थिक दबाव वाढवल्याचाही आरोप त्यांनी केला.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

दरम्यान, अमेरिकेने संयुक्त राष्ट्रांच्या तज्ज्ञ फ्रांसेस्का अल्बानीझ यांच्यावरील निर्बंध हटवले आहेत. त्या इस्त्रायलच्या ताब्यातील पॅलेस्टिनी प्रदेशांवरील संयुक्त राष्ट्रांच्या विशेष प्रतिनिधी आहेत. अमेरिकेने २०२५ मध्ये त्यांच्यावर निर्बंध लादले होते. त्यांनी इस्त्रायल आणि अमेरिकन अधिकाऱ्यांविरुद्ध कथित युद्धगुन्ह्यांच्या चौकशीची मागणी केली होती. मात्र अमेरिकन न्यायालयाने अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हवाला देत प्रशासनाच्या कारवाईवर स्थगिती दिली.

# इबोलामुळे भारत-आफ्रिका शिखर परिषद पुढे ढकलली

नवी दिल्ली

**आफ्रिकेतील** काही देशांमध्ये इबोला विषाणूचा प्रादुर्भाव वाढत असल्यामुळे भारत आणि आफ्रिकन युनियन यांनी नवी दिल्लीत होणारी चौथी भारत-आफ्रिका फोरम शिखर परिषद पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. ही परिषद २८ मेपासून होणार होती.

आफ्रिकेतील अनेक भागांमध्ये इबोलाची प्रकरणे समोर आली आहेत. त्यातील ताजे प्रकरण दक्षिण किवू येथून नोंदवण्यात आले आहे. बदलत्या आरोग्य परिस्थितीमुळे दोन्ही बाजूंनी हा निर्णय घेतल्याचे सरकारने सांगितले. भारत आणि आफ्रिकन युनियनने आफ्रिकेतील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी सहकार्य सुरू



ठेवण्यावर भर दिला आहे. या परिषदेच्या नवीन तारखा दोन्ही बाजूंच्या चर्चेनंतर जाहीर केल्या जातील, असेही स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान, भारतात अद्याप इबोलाचा एकही रुग्ण आढळलेला नाही. मात्र जागतिक आरोग्य संघटना यांनी मध्य आफ्रिकेतील परिस्थितीला गंभीर मानल्यानंतर भारत सरकारने सतर्कता वाढवली आहे.केंद्र सरकारने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना विमानतळांवर तपासणी, विलगीकरण व्यवस्था, रुग्ण उपचार आणि प्रयोगशाळा चाचण्या यासाठी तयारी ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. तज्ज्ञांच्या मते, सध्या पसरत असलेला इबोलाचा 'बुंदीबुग्यो' प्रकार तुलनेने कमी आढळणारा आहे. तो २०१४-१६ मध्ये पश्चिम आफ्रिकेत मोठ्या प्रमाणावर फैलावलेल्या 'झायर' प्रकाराइतका घातक नसला तरी खबरदारी घेणे आवश्यक आहे.

# समृद्ध युरेनियमचा साठा देशाबाहेर जाऊ देऊ नका

## मोजताबा खामेनींचे आदेश

तेहरान

**अण्वस्त्र** निर्मितीसाठी तयार करण्यात आलेले समृद्ध युरेनियमचा साठा कोणत्याही परिस्थितीत देशाबाहेर जाऊ देऊ नका,असे आदेश इराणचे सर्वोच्च धार्मिक नेते मोजताबा खामेनी यांनी संबंधितांना दिल्याचे वृत्त सुत्रांच्या हवाल्याने एका वृत्तसंस्थेने दिले आहे.

मध्यपूर्वेतील संघर्षाला तीन महिने उलटत असताना अमेरिकेने इराणला युध्दबंदीसाठी बुधवारी नवा प्रस्ताव पाठवला.या प्रस्तावावर विचार करत असल्याचे इराणने सांगितले आहे.या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मोजताबांच्या आदेशाबाबतचे हे वृत्त आले आहे.अमेरिकेच्या युध्दबंदीच्या प्रस्तावातील इराणला मान्य न होणारा मुद्दा समृद्ध युरेनियम अमेरिकेच्या स्वाधीन करणे हाच आहे.समृद्ध युरेनियम अमेरिकेला देणे म्हणजे इराणने आपला अण्वस्त्र कार्यक्रम सोडून देणे आहे.इराणचा याला विरोध आहे आणि इराण आजही त्या भूमिकेवर ठाम आहे,असा संदेश मोजताबा यांच्या या आदेशातून दिला गेला आहे.

# किंग चार्ल्स यांच्या निधनाची खोटी बातमी! ब्रिटनच्या रेडिओकडून माफी

**लंडन- ब्रिटनमधील** रेडिओ कॅरोलिन या रेडिओ स्टेशनने ब्रिटनचे राजा किंग चार्ल्स तिसरे यांच्या निधनाची चुकीची बातमी दिल्याबद्दल सार्वजनिक माफी मागितली. संगणकीय बिघाडामुळे ही चूक घडल्याचे स्टेशनने स्पष्ट केले.

स्टेशनच्या आपत्कालीन प्रणालीने चुकून राजा चार्ल्स तिसरे यांचे निधन झाले आहे, असा संदेश प्रसारित केला. ब्रिटनमधील सर्व रेडिओ स्टेशनकडे राजा किंवा राणी यांच्या निधनासाठी विशेष प्रसारण व्यवस्था तयार ठेवली जाते. मात्र, तांत्रिक बिघाडामुळे ही प्रक्रिया चुकीने सुरू झाली. स्टेशन व्यवस्थापक पीटर मूर यांनी फेसबुक पोस्टद्वारे माफी मागताना सांगितले की, ही पूर्णपणे संगणकीय त्रुटी होती. त्यांनी राजा चार्ल्स आणि श्रोत्यांची दिलगिरी व्यक्त केली. या चुकीच्या घोषणेनंतर काही वेळ रेडिओ प्रसारण बंद ठेवण्यात आले आणि नंतर स्टेशनने ऑन-एअर माफी मागत नियमित कार्यक्रम पुन्हा सुरू केले.

# पुणे विधान परिषदेसाठी महायुतीत रस्सीखेच

## भाजपानेही या जागेवर दावा ठोकला

पुणे

**पुणे** विधान परिषद निवडणुकीच्या जागेवरून महायुतीत अंतर्गत रस्सीखेच सुरू झाल्याचे चित्र आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडे ही जागा पारंपरिकरीत्या मानली जात असताना, आता भाजपानेही या जागेवर दावा ठोकला आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात गेल्या काही वर्षांत भाजपाची ताकद वाढल्याचा दावा करत पक्षाने ही जागा आपल्याला मिळावी, अशी भूमिका घेतली आहे. सध्या अजित पवार गटाकडे ३४८ मते असून, भाजपाकडे ३१९ मते असल्याने दोन्ही पक्षांमध्ये मतसंख्येच्या दृष्टीने फार मोठा फरक नसल्याचे भाजपाकडून सांगितले जात आहे. त्यामुळे विजयासाठी आवश्यक मतांची जुळवाजुळव दोन्ही पक्ष समान पातळीवर करू शकतात, असा भाजपाचा दावा आहे. या पार्श्वभूमीवर अनिल भोसले हे राष्ट्रवादीच्या तिकिटावर आमदार म्हणून निवडून आले असले तरी, भाजपाच्या उमेदवारालाही निवडून येण्याची तितकीच संधी असल्याचे भाजपाचे म्हणणे आहे.

# इंधन दरवाढीविरोधात दिल्लीत वाहतूकदारांचा संप सुरू

नवी दिल्ली

**इंधन** दरवाढीमुळे वाढलेला खर्च आणि व्यावसायिक वाहनांवर लादण्यात आलेला पर्यावरण उपकर याविरोधात ऑल इंडिया मोटर ट्रान्सपोर्ट काँग्रेसने कालपासून दिल्ली सरकारविरोधात संप पुकारला आहे. उद्या २३ मे पर्यंत हा संप सुरूच राहणार आहे. या संपामुळे शहरातील प्रवाशांचे हाल होत असून, जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यावरही परिणाम होताना दिसत आहे.

या आंदोलनामध्ये अनेक ऑटो, टॅक्सी आणि मालवाहू ट्रकवाहतूक संघटनांनी सहभाग घेतल्याने दैनंदिन प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. मध्य दिल्ली आणि नोएडा यलो लाईनमार्गे गुरुग्राम आणि दिल्ली ब्लू लाईन मार्गे पूर्व दिल्ली आणि गाझियाबाद प्रवाशांना नेहमीपेक्षा लवकर निघण्याचा सल्लाही दिला जात आहे. विशेषतः सकाळ आणि संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी वितरण बाजारपेठा आणि इंधन पुरवठा मंदावत आहे. या संपामुळे केवळ प्रवासी वाहतुकीवरच परिणाम होत

## पर्यावरण उपकर याविरोधात संप

नाही, तर एनसीआरमधील पुरवठा साखळीतही व्यत्यय येत आहे. भाजीपाला, किराणा आणि दुग्धजन्य पदार्थांच्या वितरणास विलंब होत असून, संपाच्या तीन दिवसांत ऑनलाईन मागण्या आणि औद्योगिक पुरवठ्यावरही परिणाम होऊ शकतो. हे आंदोलन सध्या तरी तीन दिवसीय असले तरी हे आंदोलन आणखी तीव्र झाल्यास काही भागांमध्ये इंधन पुरवठा आणि बांधकाम साहित्याची वाहतूक मंदावण्याची शक्यता आहे. वाहतूक संघटनांच्या मते वाढत्या इंधन किमती, वाढलेले परिचालन शुल्क आणि बीएस-आयव्ही व्यावसायिक वाहनांवरील निर्बंधांमुळे कामकाज आर्थिकदृष्ट्या कठीण झाले आहे. अनेक संघटना तत्काळ भाडेवाढ करण्याची आणि दिल्लीत प्रवेश करणाऱ्या व्यावसायिक वाहनांवर लादलेले वाढीव पर्यावरण शुल्क मागे घेण्याची मागणी करत आहेत.

दरम्यान, वाहतूक अधिकारी आणि वाहतूक निरीक्षकांनी नागरिकांना सल्ला दिला आहे की, शक्य असेल तिथे मेट्रो प्रवासाला प्राधान्य द्या.

**सचिन खेडेकर यांनी बॉलिवुड आणि मराठी चित्रपटाच्या माध्यमातून आपल्या अभिनयाचा ठसा प्रेक्षकांच्या मनावर उमटविला आहे. त्याचप्रमाणे त्यांनी छोटया पडद्यावरूनदेखील प्रेक्षकांचे मन जिंकले आहे. सांस्कृतिक दृष्ट्या सजग असलेल्या विलेपार्ले या परिसरात खेडेकर वाढले ते साहित्य, कला, नाटक, संगीत यांचे बाळकडू घेऊनच. विलेपार्लेमधील वेगवेगळ्या सेवाभावी संस्था, तसेच लोकमान्य सेवा संघाच्या वतीने होणाऱ्या नाट्यप्रयोगात खेडेकर प्रत्यक्ष सहभागी होऊ लागले. त्यांचे शालेय शिक्षण पार्ले टिळक विद्यालय येथे झाले. त्यांनी थदुमल शहानी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथून पर्यावरण अभियांत्रिकीची पदविका संपादन केली.**

# चित्रपट सृष्टीतील नावाजलेले कलाकार

# सचिन खेडेकर

खेडेकरांना नाट्य अथवा चित्रपटसृष्टीत येण्यासाठी कोणतीच कौटुंबिक पार्श्वभूमी नव्हती. सचिन खेडेकर पाच वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. सचिन व त्यांचा लहान भाऊ अशा दोन मुलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी त्यांच्या आई मंदा खेडेकर यांच्यावर येऊन पडली. खेडेकर यांच्या आई 'इंडियन एअरलाईन्स'मध्ये नोकरी करत होत्या. अभिनयासारख्या बेभरवशाच्या क्षेत्रात खेडेकर त्यांच्या आईने दिलेल्या पाठिंब्यामुळेच उभे राहू शकले. एका विद्यार्थी शिबिरात ५ नोव्हेंबर या 'रंगभूमी दिनाच्या' निमित्ताने खेडेकरांनी 'एकच प्याला' या नाटकातील 'रामलाल' या पात्राची भूमिका साकारली. हा त्यांचा पहिला नाट्यप्रवेश होता आणि या भूमिकेपासून त्यांचा अभिनयक्षेत्रातील प्रवास सुरू झाला. या प्रवासात त्यांचे गुरू विनय आपटे यांनी खेडेकरांना वेळोवेळी साथ दिली. महाविद्यालयीन काळात त्यांचा अभिनयक्षेत्रातील प्रवास जोमाने सुरू झाला. विनय आपटे, सई परांजपे, वामन केंद्रे, महेश मांजरेकर अशा गुरुस्थानी असलेल्या दिग्गजांबरोबर त्यांना काम करण्याची संधी मिळाली. 'अफलातून' या विनय आपटे व विक्रम भागवत दिग्दर्शित नाटकातून त्यांनी मराठी रंगभूमीवर आपला पहिला ठसा उमटवला. त्यानंतर 'दुसरा सामना', 'मी राष्ट्रपती', 'वाडा चिरेबंदी', 'आपसातल्या गोष्टी', 'तुझ्या-माझ्यात', 'मौन रंग' अशा मराठी नाटकांतून त्यांनी भूमिका साकारल्या. मराठी रंगभूमीसोबतच त्यांनी हिंदी व गुजराती रंगभूमीवरही तितक्याच सहजपणे काम केले.

१९९७ मधील चंद्रकांत कुलकर्णी दिग्दर्शित 'डॉक्टर आप भी' व १९९५ मधील निखिलेश शर्मा दिग्दर्शित 'श्याम रंग' ही त्यांची नाटके विशेष गाजली. सचिन खेडेकरांनी सर्वप्रथम जनसामान्यांच्या मनात प्रवेश मिळवला तो १९८९ साली दूरदर्शनवर आलेल्या विनय आपटे दिग्दर्शित 'चाळ नावाची वाचाळ वस्ती' या मालिकेद्वारे. मराठी मालिकांप्रमाणेच 'इम्तेहान' आणि 'सैलाब' या त्यांच्या हिंदी मालिकाही विशेष लोकप्रिय ठरल्या. रवी राय हे 'इम्तेहान' या हिंदी मालिकेचे दिग्दर्शक खेडेकरांचे दूरदर्शन मालिका क्षेत्रातील गुरू ठरले. रंगभूमी, दूरचित्रवाणीचा छोटा पडदा व चित्रपटांच्या मोठ्या पडद्यावरही ते सारख्याच मोकळेपणाने व सहजतेने वावरले. विशेषत: दूरचित्रवाणीवरील त्यांचा अभिनय त्यांच्या उत्तम माध्यमसाक्षरतेची साक्ष देतो. म्हणूनच वेगवेगळ्या हिंदी व मराठी मालिकांद्वारे खेडेकरांचे मराठी प्रेक्षकांच्या मनातील स्थान अधिक पक्के झाले. १९८८ मध्ये पद्मनाभ यांनी दिग्दर्शित केलेल्या





'विधिलिखित' या चित्रपटाद्वारे खेडेकरांचे मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण झाले. महेश मांजरेकर दिग्दर्शित 'अस्तित्व' (२०००), 'चिमणी पाखरे' (२००१), 'मी शिवाजी राजे भोसले बोलतोय' (२००९), 'शिक्षणाच्या आयचा घो' (२०१०), 'ताऱ्यांचे बेट' (२०११), 'लालबाग परळ' (२०१०), 'काकस्पर्श' (२०१२) हे त्यांचे विशेष गाजलेले चित्रपट. यांपैकी 'मी शिवाजी राजे भोसले बोलतोय' यातील 'दिनकरराव' या सामान्य मराठी माणसाच्या भूमिकेला प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. त्यांच्या या भूमिकेला सर्वोत्कृष्ट अभिनयाच्या जवळजवळ सर्वच महत्त्वाच्या पुरस्कारांनी गौरवण्यात आले. 'मी शिवाजी राजे भोसले बोलतोय'ला २०१० चा 'मिफ्ता' पुरस्कार मिळाला.

२०१२ मध्ये प्रदर्शित झालेल्या महेश मांजरेकर दिग्दर्शित 'काकस्पर्श' या चित्रपटातील खेडेकरांची 'हरिभाऊ' ही भूमिका विशेष लक्षात राहण्याजोगी आहे. परंपरा, प्रेम आणि सुधारक या तीन पातळ्यांवरून जाणारी ही भूमिका खेडेकरांनी सक्षमपणे साकारली. 'रुस्तम', 'घायल वन्स अगेन', 'राजवाडे अँड सन्स', 'शटर', 'गुलाबी', 'नागरीक', 'प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं', 'आजचा दिवस माझा' आदी उल्लेखनीय चित्रपटांमध्ये त्यांनी अभिनय केला आहे. मराठीप्रमाणेच हिंदी चित्रपटांमधील त्यांच्या अनेक लहान-मोठ्या साहाय्यकारी भूमिकांनी हिंदी चित्रपटसृष्टीलाही त्यांची दखल घेणे भाग पाडले. १९९७ मधील हसन मेहता यांनी दिग्दर्शित केलेला 'जयते', महेश मांजरेकर दिग्दर्शित 'पिता', संजय झा दिग्दर्शित 'प्राण जाये पर शान ना जाये' या चित्रपटातील त्यांच्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. 'गुरू', 'कालचक्र', 'यू मी और हम', 'सिंघम' बादशाह, रॉक, अनुराधा, बबल गम, तीस मार खाँ अशा अनेक हिंदी चित्रपटांतून त्यांनी भूमिका साकारल्या. सचिन खेडेकरांचा अभिनय केवळ मराठी व हिंदीपुरताच मर्यादित राहिला नाही, तर तमिळ, मल्याळम, गुजराती, इंग्रजी अशा विविध भाषांतील चित्रपटांत पाहायला मिळतो. तमिळमधील 'दैवा थिरूमंगल', मल्याळममधील 'पोलिस', गुजरातीतील 'पैसो मारो परमेश्वर' तसेच इंग्रजीतील 'ए पॉकेटफुल ऑफ ड्रीम' अशा त्यांच्या इतर भाषेतील चित्रपटांची नावे सांगता येतील सचिन खेडकर यांनी तेलुगु चित्रपट 'यात्रा' मध्ये ही अभिनय केला आहे. तो केरळमध्ये मल्याळम भाषेत डब होऊन प्रदर्शित झाला होता. सचिन खेडकर यांनी आंध्र प्रदेशचे तीनदा मुख्यमंत्री राहिलेल्या एन. टी. रामाराव यांच्या आयुष्यावरील तेलगू चरित्रपटातही भूमिका साकारलीय. 'क्रिश ३' या हिंदी व 'प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं' या मराठी चित्रपटातही ते दिसले, तर 'कोकणस्थ'मधील त्यांची भूमिकाही लक्षणीय ठरली. केवळ चित्रपटच नव्हे तर टीव्ही मालिकेतही भूमिका साकारून आपले अस्तित्व या क्षेत्रात कायम टिकवून ठेवले.

सैलाब, इम्तिहान, थोडा है थोडे कि जरुरत है, अभिमान या हिंदी टीव्ही मालिकाही आपल्या अभिनयाने गाजवल्या. प्रसिद्ध कवी गुलजार यांच्यावर आधारित 'गुलजार, बात पश्माने कि' याद्वारे कवितांचे सादरीकरणही केले.ई टी. वी. मराठी वरील कोण होईल मराठी करोडपती या कोन बनेगा करोडपती या हिंदी मालिकेवर आधारित असलेल्या मालिकेत सचिन यांनी सुत्रसंचालनाचे काम केले होते. सचिन खेडेकर यांनी 'कालचक्र' या चित्रपटाचं दिग्दर्शन सुद्धा केलं आहे. सैलाब या टीव्ही शोसाठी त्यांना उत्कृष्ट अभिनेता म्हणून पुरस्कारदेखील मिळाला आहे. तसेच ऐतिहासिक भूमिकेसाठीदेखील त्यांना उत्कृष्ट पुरस्कार प्राप्त झाला आहे. सचिन खेडेकर यांनी १९९३ साली जलपा यांच्याशी लग्न केले.

# हिंगोली-कळमनुरी मार्गावर अपघात! दोघांचा जागीच मृत्यू



हिंगोली

**हिंगोली** ते कळमनुरी मार्गावरील खानापूरचित्ता गावाजवळ कार आणि ट्रेलरचा अपघात झाला. या अपघातात कारमधील दोघांचा मृत्यू झाला. ही घटना काल मध्यरात्रीच्या सुमारास घडली.

कळमनुरी येथील साईनगर भागातील रहिवासी सुरज संजय साळवे (२६) आणि अरुण भिवाजी आम्ले (४०) हे दोघे कारने हिंगोली येथे आले होते. सुरज साळवे यांचा पुतण्या एका रुग्णालयात उपचार घेत असल्याने त्याची विचारपूस करून दोघे मध्यरात्रीच्या सुमारास कळमनुरीकडे परत निघाले होते. त्यांची कार हिंगोली-कळमनुरी मार्गावरील खानापूरचित्ता शिवारात पोहोचली असता दुरुस्तीच्या कामासाठी उभ्या केलेल्या ट्रेलरवर धडकली. धडक इतकी भीषण होती की, कारच्या काही भागाचा पूर्ण चुराडा झाला. या अपघातामुळे काही काळ वाहतूकही विस्कळीत झाली होती. अपघाताची माहिती मिळताच हिंगोली ग्रामीण पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी करत वाहतूक सुरळीत केली.

अपघातात गंभीर जखमी झालेल्या सूरज साळवे आणि अरुण आम्ले यांना तातडीने हिंगोली येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर दोघांनाही मृत घोषित केले.

# जत तालुक्यातील 'माडग्याळ' मेंढीसाठी केंद्रातील शास्त्रज्ञ येणार

सांगली

**जिल्ह्यातील** जत तालुक्यातील माडग्याळ जातीच्या मेंढीला राष्ट्रीय स्तरावरील स्वतंत्र मान्यता मिळवून देण्यासाठी केंद्रीय मेंढी व लोकर संशोधन संस्थेचे तज्ज्ञ शास्त्रज्ञ २५ व २६ मे रोजी प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी व मार्गदर्शन करणार आहेत.

माडग्याळ जातीची मेंढी दुष्काळी भागात तग धरणारी देशी जात असून, तिच्यात मजबूत शरीरयष्टी व लांब स्थलांतराची क्षमता आहे. तिला दर्जेदार मटणासाठी राज्यासह परराज्यात मागणी आहे. तिच्यामध्ये रोगप्रतिकारक क्षमता तुलनेने अधिक आहे. तिचे कमी खर्चात पालन शक्य होते. कमी चाऱ्यावरही उत्पादनक्षम राहण्याची तिच्यात क्षमता असून, स्थानिक हवामानाशी पूर्णतः जुळवून ही मेंढी प्रजात आहे. या मेंढीला राष्ट्रीय स्तरावरील स्वतंत्र मान्यता मिळवून देण्यासाठी सुरू असलेली प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असून, भारतीय कृषी अनुसंधान परिषदअंतर्गत राष्ट्रीय पशु अनुवंशिक संसाधन ब्युरो, करनाल, हरियाणा तसेच केंद्रीय मेंढी व लोकर संशोधन संस्थेचे शास्त्रज्ञ ही पाहणी करणार आहेत.

## जाहीर सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की, आमच्या अशिलांच्या वतीने आम्ही **श्रीमती भावना विनय कोठारी** यांच्या खाली अनुसूचीत अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या निवासी प्रिमायसेसबाबत (**सदर प्रिमायसेस**) कोणत्याही प्रकारच्या बोजा व भारांपासून मुक्त असलेले हक्क, शिर्षक व हितसंबंधाची चौकशी करीत आहोत.

सर्व व्यक्ती / संस्था, ज्यामध्ये इतरांबरोबरच कोणतीही बँक आणि / किंवा वित्तीय संस्था आणि / किंवा प्राधिकरण ज्यांच्याकडे सदर प्रिमायसेस किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, नियुक्ती, गहाण, शुल्क, धारणाधिकार, वारसा, वसीयत, उत्तराधिकार, भेट, देखभाल, सुखाधिकार, ट्रस्ट, वहिवाट, उप-वहिवाट, रजा आणि परवाना, काळजीवाहक तत्त्वावर, कब्जा, ताबा, कौटुंबिक व्यवस्था / तडजोड, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश, कंत्राट /करार, किंवा इतर कोणत्याही प्रकारे, कोणत्याही स्वरूपाचा हक्क, शिर्षक, लाभ, हितसंबंध, हिस्सा, दावा किंवा मागणी असल्यास त्यांनी आजच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, कागदोपत्री पुराव्यासह, अधोस्वाक्षरी करणाऱ्यास लेखी स्वरूपात तसे कळवणे आवश्यक आहे, अन्यथा, असा कोणताही हक्क, शिर्षक, लाभ, हितसंबंध, हिस्सा, दावा आणि / किंवा कोणत्याही स्वरूपाची मागणी, जर असेल तर, सर्व हेतू आणि उद्देशांकरिता सोडून दिलेली आणि / किंवा त्यागलेली आहे असे मानले जाईल.

**अनुसूची**
**(सदर प्रिमायसेसचे वर्णन)**

'चित्रकुट' म्हणून ज्ञात इमारतीतील इमारत-ए, विंग-२ मधील ६व्या मजल्यावरील निवासी फ्लॅट क्र. ६०१, क्षेत्रफळ १९७ चौ.मी. बिल्ट अप क्षेत्र, म्हणजेच २१२०.४९ चौ.फूट शी समतुल्य, जे अंतिम प्लॉट क्र. ४३९/ए/१ व सी.टी.एस. क्र. १०६५ असलेल्या जमिनीवर उभा असून, शिवाजीनगर (भांबुर्डा), तालुका हवेली, जिल्हा पुणे यांच्या हद्दीत व पुणे महानगरपालिकेच्या तसेच उपनिबंधक हवेली क्र. १, पुणे येथील सर्व भाग व खंड.

**आज दिनांकित २३ मे २०२६**

सही/-
**नीरव सी. जानी**, भागीदार
**जानी आणि पारिख** करिता
**वकिल आणि सॉलिसिटर**
३११, दलामल टॉवर्स,
२११, फ्री प्रेस जर्नल रोड, नरिमन पॉइंट, मुंबई ४०० ०२१.
ईमेल: nirav@janiparikh.in

Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

## रोनित रॉयचा इशारा...



**अभिनेता** रोनित रॉय याने सोशल मीडियाच्या माध्यमातून एक जाहीर इशारा दिला आहे. ऑनलाईन क्षेत्रात एका अज्ञात व्यक्तीकडून त्याच्या नावाचा गैरवापर केला जात असल्याचे समोर आले आहे. हा फसवणूक करणारा व्यक्ती रोनित रॉय बनून लोकांशी, विशेषतः महिलांशी संपर्क साधत असून, त्यांच्याकडे पैशांची मागणी करत आहे. या सायबर गुन्ह्याबाबत रोनितने चाहत्यांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. या संदर्भातील सविस्तर माहिती देताना रोनितने सांगितले की, संबंधित व्यक्ती त्याच्या नावाचा वापर करून लोकांपर्यंत पोहोचत आहे आणि खोट्या बुकिंग्स घेण्याचाही प्रयत्न करत आहे. रोनितने फसवणूक करणाऱ्या व्यक्तीचे तपशील उघड केले असून, 'पोलीस तुझ्या शोधात येत आहेत,' असा फसवणूक करणाऱ्याला थेट इशारा दिला आहे.


या विधानासोबतच रोनितने काही स्क्रीनशॉट्स देखील प्रसिद्ध केले आहेत. यामध्ये व्हॉट्सॲप चॅट, फेसबुक मेसेजेस आणि संबंधित फोन नंबर दिसत असून, फसवणूक करणारा व्यक्ती कशा प्रकारे महिलांना जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करत होता, हे उघड झाले आहे. सेलिब्रिटींच्या नावाचा गैरवापर करून निष्पाप लोकांची फसवणूक करणाऱ्या अशा प्रवृत्तींपासून सर्वांनी अत्यंत सावध राहावे, असे आवाहन त्याने शेवटी केले आहे.

## 'चाँद मेरा दिल'ची लांबी वाढली...



**अभिनेता** लक्ष्य आणि अभिनेत्री अनन्या पांडे यांच्या मुख्य भूमिका असलेला 'चाँद मेरा दिल' हा प्रेमपट प्रदर्शित होण्यापूर्वीच त्याची लांबी ११ मिनिटांनी वाढवण्यात आली आहे. केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाने या वाढीव भागासह चित्रपटाला मंजुरी दिली आहे. यापूर्वी ८ मे रोजी सेन्सॉर बोर्डाने या चित्रपटाला 'यु/ए १६+' प्रमाणपत्र दिले होते, तेव्हा त्याची लांबी १३५.३६ मिनिटे (२ तास १५ मिनिटे ३६ सेकंद) इतकी होती. मात्र, चित्रपट निर्मात्यांनी स्वेच्छेने यामध्ये काही नवीन दृश्ये जोडण्याचा निर्णय घेतला आणि २० मे रोजी पुन्हा एकदा मंजुरीसाठी बोर्डाकडे अर्ज केला. सेन्सॉर बोर्डाने या नवीन भागाची पाहणी करून या वाढीव आवृत्तीला हिरवा कंदील दिला आहे. चित्रपटामध्ये एकूण ८ नवीन दृश्ये जोडण्यात आली आहेत. या जोडलेल्या दृश्यांचा एकूण कालावधी १० मिनिटे आणि १७ सेकंद इतका आहे. यामध्ये पहिल्या भागातील ३ मिनिटे ५५ सेकंदांच्या एका मोठ्या दृश्याचाही समावेश आहे. या बदलांनंतर आता 'चाँद मेरा दिल' या चित्रपटाचा एकूण कालावधी १४५.५३ मिनिटे म्हणजेच २ तास २५ मिनिटे ५३ सेकंद इतका झाला आहे. वाढलेल्या कालावधीमुळे चित्रपटगृहांना त्यांच्या खेळांचे नियोजन पुन्हा नव्याने करावे लागत आहे. तसेच सध्या बॉक्स ऑफिसवर मराठी चित्रपट 'देऊळ बंद २' अपेक्षेपेक्षा चांगली कामगिरी करत असल्याने काही भागांमध्ये त्याला मोठी मागणी दिसून येत आहे.

## वरुण झळकणार हॉलिवूडपटात



**बॉलिवूड** अभिनेता वरुण धवन लवकरच हॉलिवूडमध्ये पदार्पण करण्याची शक्यता असून, त्या दृष्टीने त्याच्या चर्चा सुरू आहेत. वरुणला एका हॉलिवूड चित्रपटाची ऑफर मिळाली असून, गेल्या काही आठवड्यांपासून यावर सातत्याने बोलणी सुरू आहे.

या संदर्भात वरुणने नुकताच हॉलिवूडचे प्रसिद्ध निर्माते लॉरेन्स कासानॉफ यांच्याशी संपर्क साधला असून, दोन्ही बाजूंनी ही चर्चा आता प्रगत पातळीवर पोहोचली आहे. अद्याप गोष्टी अंतिम टप्प्यात असल्या तरी हा चित्रपट वरुणच्या कारकिर्दीसाठी जागतिक पातळीवर एक मोठे पाऊल ठरू शकतो.

विशेष म्हणजे वरुणने यापूर्वी मार्च महिन्यात एका पॉडकास्टमध्ये बोलताना आपल्या वडिलांना म्हणजेच डेव्हिड धवन यांना सुखद धक्का देण्यासाठी त्याला हॉलिवूडमधूनच पदार्पण करायचे होते आणि स्टीव्हन स्पिलबर्ग किंवा अनुराग कश्यप यांनी आपल्याला लाँच करावे, अशी त्याची इच्छा होती, असे सांगितले होते.

## रिचा आणि अली फजलचा न्यूझीलंडमध्ये जलवा

**अभिनेत्री** रिचा चड्ढा आणि अभिनेता अली फजल ही जोडी न्यूझीलंडमधील पहिल्यावहिल्या 'द इंडियन फिल्म फेस्टिव्हल ऑफ न्यूझीलंड' या भारतीय चित्रपट महोत्सवाच्या अधिकृत शुभारंभासाठी उपस्थित राहणार आहे. २ जून २०२६ रोजी होणाऱ्या या उद्घाटन सोहळ्यात या दोन्ही कलाकारांनी निर्माता म्हणून तयार केलेल्या 'गर्ल्स विल बी गर्ल्स' या पहिल्या चित्रपटाचे विशेष स्क्रिनिंग आयोजित करण्यात आले आहे. या चित्रपटाला यापूर्वी सनडान्स आणि इंडिपेंडंट स्पिरिट अवॉर्डससारख्या अनेक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये सन्मानित करण्यात आले आहे.

या चित्रपट महोत्सवाची अधिकृत सुरुवात ऑक्टोबर २०२६ मध्ये न्यूझीलंडच्या विविध शहरांमध्ये होणार असून, हा तेथील पहिलाच समर्पित भारतीय चित्रपट महोत्सव असेल. पेट्रीना डी'रोझारियो यांनी या महोत्सवाची स्थापना केली असून, भारतीय चित्रपटसृष्टीचा गौरव करणे आणि भारत व न्यूझीलंड यांच्यात अधिक दृढ सांस्कृतिक आणि रचनात्मक सहकार्य निर्माण करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. चित्रपटसृष्टीत केवळ अभिनयापुरते मर्यादित न राहता निर्मिती क्षेत्रातही पाऊल टाकणाऱ्या रिचा आणि अली यांच्यासाठी हा सोहळा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.



## वाङ्मयचौर्याच्या आरोपावर प्रीतमचा खुलासा





**प्रसिद्ध** संगीतकार प्रीतम यांनी 'कॉकटेल २' चित्रपटातील 'माशुका' या गाण्यावर झालेल्या वाङ्मयचौर्याच्या आरोपांवर अखेर आपली प्रतिक्रिया दिली आहे. या गाण्यावरून समाजमाध्यमांवर त्यांना ट्रोल करणाऱ्यांवर निशाणा साधताना, हे ट्रोल्स आता आपली 'विनामोबदला काम करणारी पीआर टीम' बनले आहेत, असा टोला त्यांनी लगावला आहे. शाहिद कपूर आणि कृती सेनॉन यांच्या मुख्य भूमिका असलेल्या या चित्रपटातील 'माशुका' हे गाणे नुकतेच प्रदर्शित झाले असून, प्रेक्षकांमध्ये ते लोकप्रिय ठरत आहे. मात्र, गाणे प्रदर्शित झाल्यानंतर लगेचच नेटकऱ्यांनी या गाण्याची धून इतर कोणत्यातरी गाण्यावरून कॉपी केल्याचा आरोप करत प्रीतम यांना ट्रोल करण्यास सुरुवात केली. या संपूर्ण वादावर प्रीतम यांनी अत्यंत उपरोधिकपणे उत्तर दिले आहे. नकारात्मक प्रसिद्धी देखील एक प्रकारे गाण्याचा प्रसार करण्यास मदत करते, असे सुचवत त्यांनी ट्रोलर्सचा समाचार घेतला. ट्रोल्समुळे गाण्याभोवती आणखी चर्चा निर्माण होते आणि नकळतपणे गाण्याची प्रसिद्धी मोफत होते, असे त्यांचे म्हणणे आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रीतम यांच्यावर अनेक गाण्यांच्या चाली कॉपी केल्याचे आरोप झाले आहेत. मात्र तरीही त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीला अनेक अजरामर गाणी दिली आहेत.

## गांगुलीच्या बायोपिकमध्ये नवा प्रवेश





**भारतीय** क्रिकेट संघाचे माजी कर्णधार सौरव गांगुली यांच्या जीवनावर आधारित 'दादा' या बहुप्रतीक्षित बायोपिकमध्ये एका प्रसिद्ध अभिनेत्याची भर पडली आहे. या चित्रपटात मुख्य भूमिकेत अभिनेता राजकुमार राव दिसणार असल्याची घोषणा आधीच झाली होती, तर आता प्रसिद्ध बंगाली अभिनेते शाश्वत चॅटर्जी या चित्रपटाच्या कलाकारांमध्ये सामील झाले आहेत. 'कहाणी' चित्रपटातील बॉब बिस्वास या व्यक्तिरेखेमुळे देशभरात ओळखले जाणारे शाश्वत या चित्रपटात सौरव गांगुली यांच्या वडिलांची म्हणजेच चंडी गांगुली यांची भूमिका साकारणार आहेत. सध्या मुंबईत सुरू असलेल्या या चित्रपटाच्या चित्रीकरणात ते सहभागी झाले आहेत. यासोबतच सौरव गांगुली यांच्या आईच्या (निरूपा गांगुली) भूमिकेसाठी अपराजिता ऑडी आणि भावाच्या (स्नेहाशिष गांगुली) भूमिकेसाठी राहुल देव बोस यांची निवड करण्यात आली आहे. विक्रमादित्य मोटवाने करत असून, 'लव्ह फिल्म्स'च्या बॅनरखाली लव्हरंजन आणि अंकुर गर्ग याची निर्मिती करत आहेत.

---

## शिखर समितीच्या बैठकीत 'भिमाशंकर-खेड'चा आग्रह

■ पुणे

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत श्रीक्षेत्र भीमाशंकर मंदिर, खेड-आंबेगाव असा उल्लेख करण्यात आल्याने खेड तालुक्यात नाराजी व्यक्त होत आहे. भीमाशंकर हे खेड तालुक्यात असल्याने भीमाशंकर खेड असाच उल्लेख करण्यात यावा, अशी मागणी माजी आमदार दिलीप मोहिते यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन दिले आहे. खेड-आंबेगाव असा उल्लेख कायम राहिल्यास भविष्यात खेड तालुक्याची ओळख आणि अस्मिता धोक्यात येईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.दिलीप मोहिते म्हणाले की, श्रीक्षेत्र भीमाशंकर हे खेड तालुक्याच्या परंपरा, संस्कृती आणि अस्मितेशी जोडलेले श्रद्धास्थान आहे. शिखर समितीच्या बैठकीत 'श्रीक्षेत्र भीमाशंकर खेड-आंबेगाव' असा उल्लेख करण्यात आला. या उल्लेखास अधिकृत मान्यता मिळाल्यास भविष्यात गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे अधिकृत कागदपत्रांमध्ये भीमाशंकर खेड असाच उल्लेख करण्यात यावा.

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श ग्राम प्रकल्प विकास आराखडा संदर्भात ही शिखर समितीची बैठक झाली.

## तारकर्ली समुद्रात पुण्याचा २२ वर्षीय तरुण बुडाला

■ मालवण

**सिंधुदुर्गातील** मालवण तालुक्यातील तारकर्ली समुद्रात पुण्यातील २२ वर्षीय तरुण बुडाला. तर एकाला वाचवण्यात यश ग्रामस्थांना आले. तीन दिवसांपूर्वीही येथील दांडी समुद्रकिनाऱ्यावर एका पर्यटकाचा मृत्यू झाला होता.

तारकर्ली येथील एमटीडीसी समोरील समुद्रात आंघोळीसाठी पुण्यातील आंबेगाव येथील समर्थ गणेश कर्पे (२२) आणि ऋषभ रविकिरण कदम हे दोन तरुण गेले होते. मात्र काही वेळातच हे दोघेही लाटांच्या तडाख्यात सापडले. दोघेही पाण्यात बुडू लागले.

त्यावेळी परिसरात असलेल्या ग्रामस्थांनी ऋषभला कसेबसे सुखरूप बाहेर काढले. मात्र, ते समर्थजवळ पोहोचण्याआधीच तो पाण्यात बुडून बेपत्ता झाला. वाचलेल्या ऋषभवर सध्या मालवण ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## नागपूर विमानतळावरून १ जूनपासून अनेक उड्डाणे बंद



■ नागपूर

**नागपूरच्या** डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावरून १ जूनपासून अनेक महत्त्वाची उड्डाणे बंद होणार आहेत. विमान इंधनाच्या वाढत्या दरांमुळे कंपन्यांचा संचालन खर्च मोठ्या प्रमाणात वाढल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. याचा फटका मुंबई, बंगळुरू, हैदराबाद आणि कोलकाता मार्गांवरील प्रवाशांना बसणार आहे.

नागपूर-मुंबई मार्गावरील एअर इंडियाची सकाळची आणि संध्याकाळची उड्डाणे १ जून ते ३१ जुलैदरम्यान रद्द करण्यात आली आहेत. तसेच नागपूर-बंगळुरू मार्गावरील काही उड्डाणे १ जूनपासून आणि काही १६ जूनपासून बंद होणार आहेत. हैदराबाद मार्गावरील दुपारची उड्डाणेही १६ जूनपासून थांबवण्यात येणार आहेत. १ जूनपासून कोलकाता मार्ग पूर्णपणे बंद होणार असून, अहमदाबादच्या उड्डाणांतही कपात करण्यात आली आहे. उड्डाणे कमी झाल्याने तिकिटांचे दर वाढण्याची शक्यता आहे.

## पैशांच्या किरकोळ वादातून परळीत हॉटेल चालकाची हत्या

### दोन जणांविरोधात गुन्हा दाखल

■ बीड

**बीडच्या** परळी वैजनाथ शहरात पैशांच्या किरकोळ वादातून एका हॉटेल चालकाची चाकूने गळा चिरून हत्या करण्यात आली. कारभारी नारायण आंधळे असे त्याचे नाव असून, या प्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात दोन संशयित आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

कारभारी आंधळे हे परळी शहरात पवन हॉटेल चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. काल रात्री हॉटेल बंद झाल्यानंतर कारभारी आंधळे हे संशयित आरोपी सचिन सोमनाथ राठोड आणि सुमीत पवार यांच्यासोबत होते. त्यावेळी पैशांच्या देवाणघेवाणीवरून त्यांच्यात वाद झाला. हा वाद काही वेळातच हाणामारीपर्यंत पोहोचला. यावेळी संशयित आरोपी सचिन राठोड याने कारभारी आंधळे यांना घट्ट पकडून ठेवले, तर सुमीत पवार याने चाकूने त्यांच्या मानेवर आणि हातावर वार केले. घटना घडल्यानंतर संशयित आरोपी सचिन राठोड यानेच कारभारी आंधळे यांच्या लहान मुलाला फोन करून तुमचे वडील जखमी अवस्थेत पडले असल्याची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच मृताचे मोठे चिरंजीव ओमकेश आंधळे आणि नातेवाईकांनी घटनास्थळी पोहोचून त्यांना रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात विद्यापीठ उभारण्याचा प्रस्ताव!

### आदित्य ठाकरेंनी केला जोरदार विरोध

■ मुंबई

**बोरिवली** येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात कोणतेही विद्यापीठ उभारण्यास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. मुंबईकरांना अशा प्रकल्पांची बिलकूल गरज नाही, असे आदित्य ठाकरे यावेळी म्हणाले.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे नाव बदलून 'अटल बिहारी वाजपेयी पार्क' ठेवण्याच्या आणि 'भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी विद्यापीठा'ची स्थापना करण्याच्या प्रस्तावांविषयीच्या वृत्तांवर प्रतिक्रिया देताना आदित्य ठाकरे म्हणाले की, हा निव्वळ मूर्खपणा आणि स्वार्थ आहे. ज्याने कोणी असे प्रस्ताव मांडले आहेत, त्यांना एकतर तुरुंगात टाकले पाहिजे किंवा त्यांच्यावर उपचारांची गरज आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान हे एक संरक्षित जंगल असून, ते मुंबई शहराच्या हद्दीत १०३ चौरस किलोमीटर क्षेत्रात पसरलेले आहे आणि येथे बिबट्यांची मोठी वस्ती आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या आत विद्यापीठ आणि ५ लाख लोकांसाठी गृहनिर्माण प्रकल्प उभारण्याचा विचार तरी कोणी कसा करू शकतो, असा प्रश्नही आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला.



## येवला कृषी उत्पन्न बाजार समितीत कांदा २ रु. किलो! शेतकरी संतप्त


■ नाशिक

**जिल्ह्यातील** येवला कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांद्याला चक्क २ रुपये किलो दर मिळाल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत. उत्पादन खर्चही निघत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. कवडीमोल भावाने विकल्या जाणाऱ्या कांद्यामुळे शेतकऱ्याची आर्थिक कोंडी झाली आहे. नाशिकच्या येवला कृषी उत्पन्न बाजार समितीत तर कांद्याने दराचा आतापर्यंतचा नीचांक गाठला आहे. कांद्याला प्रति क्विंटल दोनशे रुपये म्हणजेच २ रुपये किलो दर मिळाल्याने शेतकऱ्यांनी प्रचंड संताप व्यक्त केला आहे. दोन रुपयांत साधा चहादेखील येत नाही. मात्र शेतात घाम गाळून पिकवलेल्या कांद्याला २ रुपयांचा भाव मिळत असल्याने घर चालवायचे कसे असा सवाल शेतकरी करत आहेत.

## चित्रकार लिओनार्दो दी सेर पिएरोदाविंची

**लिओनार्दो यांचा जन्म १५ एप्रिल १४५२ रोजी आंकियानो, फ्लॉरेन्स, इटली येथे झाला. लिओनार्दो हे १५ व्या शतकात रेनेसान्स काळात झालेले एक महान चित्रकार व संशोधक होते. कलेच्या इतिहासात त्यांनी संशोधक वृत्तीने दिलेल्या अमूल्य योगदानामुळे त्यांचे नाव नेहमीच अग्रस्थानी राहिले आहे. लिओनार्दोने अनेक क्षेत्रांत योगदान दिले असले, तरी इतिहासात त्यांचे नाव चित्रकार म्हणून ठळकपणे दिसते.**




मोनालिसा, द लास्ट सपर, मॅडोना ऑफ द रॉक्स ही त्याची काही जगप्रसिद्ध चित्रे आहेत. चित्रांवरून त्याचे तत्कालीन चर्च या धर्मसंस्थेसोबत असलेले मतभेद, उलट अक्षरे काढून लिहिण्याची सवय, नव्याने सापडलेल्या त्यांच्या नोंदवह्यांतील आश्चर्यकारक माहिती व कित्येक विचारवंतांनी त्यांचा अभ्यास करून मांडलेली मते, यावरून लिओनार्डो विसाव्या शतकापासून काहीसा गूढतेच्या वातावरणात आला आहे. त्यातच त्याच्या विविध चित्रांचा अभ्यास वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून सुरू झाला. तत्कालीन सामाजिक, राजकीय व धार्मिक परिस्थितीचा अभ्यास केलेले विचारवंत त्याच्या चित्रांवरून वेगवेगळ्या संदेशांच्या कल्पना करतात. डॅन ब्राऊन या लेखकाने नुकतीच 'दा व्हिंची कोड' या काल्पनिक कादंबरीत लिओनार्दोची वेगळीच गूढ भूमिका मांडली. लिओनार्दो त्याच्या आईवडिलांचे अनौरस अपत्य होता. जन्मानंतर त्याचा सांभाळ ५ वर्षे आईनेच केला. त्यानंतर मात्र त्याच्या वडिलांनी त्याचा सांभाळ करायची तयारी दर्शविली व याचवेळी त्याच्या आईचेही लग्न ठरले. अशात लिओनार्दो त्याच्या वडिलांकडे फ्लॉरेन्सला आला. त्याचे वडील सधन होते. लिओनार्दोच्या शिक्षणाकडे, देखभालीकडे त्यांनी योग्य लक्ष पुरवले. त्याची कलेतील आवड लक्षात घेऊन त्याला वेरोशिओ या प्रसिद्ध चित्रकाराकडे शिक्षणासाठी पाठवले. चित्रकला, शिल्पकला अशा शास्त्रांचा अभ्यास त्याने वेरोशिओकडे केला. याचवेळी त्याने स्वत:हून इतर शाखांचाही अभ्यास चालू ठेवला. चर्चच्या दबावामुळे लिओनार्दोला अखेर 'मॅडोना ऑफ द रॉक्स'चे दुसरे चित्रही रंगवावे लागले. पहिले चित्र सध्या फ्रान्सच्या पॅरिस येथील लूव्र संग्रहालय येथे आहे तर दुसरे लंडन येथील म्युझियममध्ये आहे. पहिल्या चित्राला सध्या मॅडोना ऑफ द रॉक्स (लुव्र व्हर्जन) व दुसऱ्या चित्राला मॅडोना ऑफ द रॉक्स (लंडन व्हर्जन) म्हणून ओळखतात. लिओनार्दो दी सेर पिएरो दा विंची यांचे निधन २ मे १५१९ रोजी झाले.





# नवाकाळ शब्दकोडे–१६१४



**आडवे शब्द –**

१. पाळलेली मांजरी ३. चुरस, स्पर्धा ६. फसवणे ८. हाकलून देणे, कामावरून कमी करणे ११. महाभारतातील अती खादाड राक्षस १३. पेरणी १४. बिन तेलाची लहान पोळी १५. टिंगलखोर, कुचेष्टा करणारा १६. गोडवा देणारा पदार्थ १८. आईची बहीण २०. दोस्त २२. दरारा, दहशत २३. मच्छर २४. पशुवत वागणे २६. गोष्ट २६अ. भीतीदायक २८. छोटा, लहान ३०. नातू ३१. डेरा, मोठा माठ ३२. त्रास ३३. पत्नीचे निधन झालेला पुरुष ३४. काळजी, भयंकर ३५. पचायला सोपी पौष्टिक डाळ ३६. कोळसे, लाकूड इ. चे दुकान ३८. सोबती ३९. स्पष्टीकरण ४२. रोटीचा एक प्रकार ४६. आईचा भाऊ ४७. केसांना दिला जाणारा रंग ४९. संसाररूपी सागर ५१. निधन ५२. कचखाऊ, ऐन प्रसंगी पळ काढणारा ५४. चेष्टा ५५. आय, उत्पन्न ५६. दृढनिश्चयी ५७. एक लाख ५८. चांगले ६०. कान ६१. मार्गातली अडचण ६२. कंडक्टर ६४. शिकार ६६. दानधर्म करणारा ६८. निर्मूलन ७०. वानर ७१. गणपतीसाठी शोभिवंत बैठक ७३. घटस्फोट ७४. वितरण ७५. फाटलेल्या दुधातील पाणी काढून राहणारा साका ७९. घोड्याचा रोजचा खुराक ८०. पोस्टाने आलेले पत्र ८२. पश्चिम बंगालची राजधानी ८४. डच्चू ८७. लगेच ८९. सूड ९१. तमाशा ९२. आरोळी ९३. हुषारीच्या आवेशात असणारा मूर्ख ९६. जोरात सुटलेले वारे ९८. श्रीकृष्णाने वसविलेली राजधानी १००. पक्ष्याचे घरटे १०१. धुरा वाहणारा, जिम्मेदार १०२. तोंडाने हलकेच वाजवलेली शिट्टी १०३. सलगी

**उभे शब्द –**

१. 'कबीराचे विणतो शेले कौसल्येचा राम बाई कौसल्येचा राम, ××× × ×××× ×× ×× ××' (सिनेमा : गंगेत घोडं न्हालं) २. भाष्य, टिप्पणी, मल्लिनाथी ३. खंदक ४. जिव्हाळा, आर्द्रता ५. सैल ६. धुमाकूळ ७. खेप, चक्कर ८. कमी वजनाचा ९. चुलता १०. मुक्काम, होडके १२. पुत्र १५. एकाच दिशेला बघत राहणे १७. हडकुळा १८. शिरोभाग, कळस १९. गार २१. शान २२. काम होईल की नाही याची हुरहूर २३. दरोडा २४. भांडे २५. पराक्रमी स्त्री २६. दया २७. नूतन २९. शकुन बघण्याची विद्या ३०. नागरिक ३२. माळ, माला ३४. अश्व ३७. स्वयंपाकी, आचारी ३९. पार्वती ४०. गोरा व सावळा यांच्यामधला रंग ४१. जाड, लठ्ठ ४३. आकाश ४४. दूर गेलेला, परका ४५. फक्त ४६. अपमान ४७. दृष्टिक्षेप ४८. टोल ५०. प्रतिष्ठित ५२. सरकारी परवानगीचे पत्र, लायसेन्स ५३. रोमांच ५९. भगवान शंकराचे शस्त्र ६३. हेकट ६४. पातकी ६५. रक्तवाहिनी ६७. तळलेला त्रिकोणी आकाराचा तिखट पदार्थ ६९. प्रयास ७०. दुष्ट हेतू ७२. कोळशाची भुकटी, आवाजातील घोगरेपणा ७५. प्रत्युत्तरादाखल केलेला वार ७६. दिवंगत ७७. पुढारी ७८. पूर्ण न केलेले ७९. पृथ्वीचा उपग्रह ८१. पांडवांची संख्या ८३. सल, टोचणी ८५. चैन ८६. विनंतीचे पत्र ८८. सरिता ८९. भावाची बायको ९०. अलगूज ९२. नवरात्रातील गुजराथी नृत्य ९४. शंका, पाऊल ९५. आंब्याची लोकप्रिय महाग जात ९७. चोपडी ९८. दरवाजा ९९. वाराणसी •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६१३ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. कमावता ५. खात्रीलायक १०. विशाल ११. ठसठशीत १३. दळणवळण १४. हर १५. वरमाई १७. नार १८. गुंजारव १९. आण २०. शनी २१. दाब २२. सुटका २४. नकार २६. समस्त २७. मन २८. मेधा २९. सामील ३०. कवळी ३१. सवलत ३२. मोह ३३. वाली ३५. आनन ३६. लज्जा ३७. पढतमूर्ख ३८. जलद ३९. तंबी ४०. अंबा ४१. वाढ ४३. बाग ४४. रजनीकर ४६. अपुरा ४७. समरगीत ४८. जन ५०. परी ५१. काहील ५२. संतोष ५३. कंठगत ५५. सायास ५७. उजाड ५८. तोडगा ५९. हाटक ६०. माह ६२. शिळा ६३. लटपट ६५. वहीम ६७. रम्य ६९. मान्य ७०. कडू ७२. नतमस्तक ७४. कसाबसा ७५. कळी ७७. दयाळू ७८. तनया ८०. ढास ८१. कंठा ८२. गाव ८३. सिंहगड ८६. रसभरित ८९. बारीक ९१. हलाहल ९२. रजक ९३. पत्नी ९४. डमरू

**उभे शब्द** : १. कशाला जाऊ मी पंढरपुरी २. माल ३. ताठर ४. आठवण ५. खातमा ६. लाली ७. कदरदान ८. झुणका ९. बळकट १२. शीर १४. हवन १६. ईशस्तवन १९. आरवणे २२. सुधा २३. काहिली २५. काक २६अ. मसनद २७. मतलबी २८. मेहरबानी ३३. वारंवार ३४. समूळ ३५. आलमगीर ३९. तंगडतोड ४०. अंजन ४२. कोमल ४४. रज ४५. कर्मठ ४६. अपरिहार्य ४७. सहीसलामत ४९. ज्ञात ५१. काया ५२. संजाब ५३. कंगाल ५४. गळेपडू ५५. साकव ५६. घुमा ५८. तोळामासा ६१. हरकत ६४. टकळी ६६. हीन ६८. ठसा ७१. भयावह ७३. महाग ७४. कयास ७४अ. बकरी ७५. कसब ७६. रोठा ७७. दगा ७९. नरक ८१. कंडम ८३. सिंह ८४. हल ८५. डबा ८७. भक्त ८८. तप ९०. रड

# कोकणात साकारणार देशातील पहिले समुद्राच्या तळाशी वसलेले संग्रहालय

पान १ वरून

शिपबिल्डर्स लिमिटेडच्या (एमडीएल) मदतीने हाती घेतले होते. शास्त्रीय पद्धतीने ही नौका समुद्रात बुडवून ती समुद्राच्या तळाशी स्थापित करण्यात आली. हे काम १९ मे रोजी पूर्ण झाले.

सिंधुदुर्ग किनारपट्टीपासून जवळ असलेल्या निवती रॉकलगत ही ८३.९ मीटर लांबीची युद्धनौका स्थापित करण्यात आली आहे. स्कुबा डायव्हिंग, गायडेड रेक डायव्हिंग, साहसी पर्यटन, पाण्याखाली छायाचित्रण आणि सागरी परिसंस्थेचा अभ्यास इत्यादीसाठी हे संग्रहालय अत्यंत महत्त्वाचे स्थान ठरणार आहे. १९८५ मध्ये पोलंडच्या डीनिया बंदरातून नौदलाच्या सेवेत रुजू झालेली आयएनएस गुलदार सुमारे ३९ वर्षे नौदलाच्या सेवेत होती. १२ जानेवारी २०२४ रोजी तिला सेवेतून निवृत्त करण्यात आले. समुद्राच्या तळाशी स्थापित करण्यापूर्वी आयएनएस गुलदारची अत्यंत काटेकोरपणे साफसफाई करण्यात आली. नौकेवरील कोणत्याही गोष्टीमुळे सागरी परिसंस्थेला नुकसान पोहोचू नये यासाठी ही सफाई करण्यात आली. नौकेवरील हानिकारक धातू आणि वस्तू काढून टाकण्यात आल्या. त्यानंतर समुद्राच्या तळाशी जिथे ही नौका विसावणार आहे त्याठिकाणी नैसर्गिक प्रवाळ बेट नाही याची खात्री करण्यासाठी वैज्ञानिक सर्वेक्षण करण्यात आले. सागरी परिसंस्थेला या संग्रहालयामुळे कोणताही धोका नाही याची खात्री झाल्यानंतरच ही नौका त्या ठिकाणी स्थापित करण्यात आली.

# इंधन टंचाईमुळे परभणीत डिझेलसाठी सातबाराची अट

पान १ वरून

कामे ठप्प झाली आहेत. हिंगोली जिल्ह्यातील बहुतांश पेट्रोल पंपांवर डिझेलचा साठा संपल्याने नो स्टॉकचे फलक दिसत आहेत. ज्या काही पंपांवर डिझेल उपलब्ध आहे, तिथे वाहनांच्या लांबच लांब रांगा होत्या. धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर येथे सीएनजी पंपावर चालकाला मारहाण झाल्याची घटना घडली. अनेक ठिकाणी शेतकरी हातात कॅन घेऊन तासन्तास उभे राहत आहेत. काही इंधन टंचाईमुळे कॅनची मागणी वाढून त्यांच्या किमतीही वाढल्या आहेत.

परभणीत पंप मालकांनी असा आदेश काढला की, साठेबाजी होऊ नये यासाठी सातबारा आणि आधार कार्ड असलेल्यांनाच डिझेल देण्यात येईल. मात्र, या आदेशामुळे शेतकरी संतापले आहेत. कृषीमंत्री दत्ता भरणे यांनी याबाबत बोलताना सांगितले की, अशी अट घालणे चुकीचे आहे. जिल्हाधिकाऱ्यांना याची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना इंधनाच्या साठेबाजीवर लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. तर राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी राज्यात कोणत्याही प्रकारची इंधनटंचाई नसल्याचा दावा केला. ते म्हणाले की, नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवून गरजेपेक्षा अधिक पेट्रोल-डिझेल खरेदी करू नये. गेल्या काही दिवसांत अतिरिक्त खरेदीमुळे मे महिन्यात इंधन विक्रीत सुमारे २० टक्क्यांनी वाढ झाली आहे.

# ऑपरेशन टायगरचे नाव स्लो ऑपरेशन ठेवा

मुंबई

## खासदार आष्टीकरांचा टोला

**हिंगोलीचे** उबाठा खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी आज पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. त्यांनी सत्ताधारी शिवसेनेच्या ऑपरेशन टायगर मोहिमेची खिल्ली उडवली. आपण निवडून आल्याच्या दुसऱ्या महिन्यापासून ऑपरेशन टायगर सुरू आहे, असे सांगताना आता ऑपरेशन टायगरचे नाव बदलून स्लो ऑपरेशन ठेवा, असा टोला आष्टीकर यांनी लगावला.

उद्धव ठाकरे यांनी विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील पक्ष पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली होती. या बैठकीला नागेश पाटील आष्टीकर यांच्यासह हिंगोली, परभणी, नांदेड, धाराशिव आणि जालना येथील पदाधिकारी उपस्थित होते. काही दिवसांपासून नागेश पाटील आष्टीकर पक्षावर नाराज असल्याच्या चर्चा सुरू होत्या. काही दिवसांपूर्वी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्याने ते शिंदे गटात जाणार असल्याच्या चर्चांनाही उधाण आले होते. तसेच, पक्षाच्या काही बैठकींना त्यांनी अनुपस्थिती लावल्यामुळे या चर्चांना आणखी बळ मिळाले होते.

# तानाजी सावंतांच्या मंत्रिपदाच्या काळात कॅथलॅब खरेदीत ३४५ कोटींचा घोटाळा

पान १ वरून

कंत्राटदारांना जवळपास ८० टक्के रक्कम देण्यात आली. हे संपूर्ण भ्रष्टाचाराचे प्रकरण आहे.

संदीप देशपांडेंनी आरोप केला की, कॅथलॅब युनिट्सची खरेदी बाजारभावापेक्षा चारपट अधिक दराने करण्यात आली. तसेच, सर्व १९ ठिकाणी प्रत्यक्षात युनिट्स बसवण्यात आले आहेत की, नाही याबाबतची माहितीही शासनाकडून स्पष्टपणे देण्यात आलेली नाही. तानाजी सावंत आरोग्यमंत्री असताना ही प्रक्रिया सुरू झाली होती. त्यामुळे त्या काळातील संबंधित अधिकारी आणि राजकीय पदाधिकाऱ्यांची चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्यात यावी. याबाबत आम्ही पुढच्या आठवड्यात आंदोलन करणार आहोत.

# मुंबईच्या उपनगरांत रिमझिम पाऊस

पान १ वरून

शहरासह तालुक्यात अनेक ठिकाणी पाऊस झाल्याने वातावरण आल्हाददायक झाले. हवामान विभागाने मुंबईतील अनेक भागांत पुढील ३६ ते ४८ तासांत पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार, मध्य महाराष्ट्रातही पावसासाठी पोषक परिस्थिती तयार होत आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, नैऋत्य मान्सून सुमारे २६ मेच्या दरम्यान केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता असून, त्यानंतर तो टप्प्याटप्प्याने पुढे सरकत जूनच्या सुरुवातीला महाराष्ट्रात पोहोचू शकतो. रायगडमधील दक्षिण भगात आणि माणगाव , महाड , म्हसळा आणि श्रीवर्धन पाउस. रत्नागिरीत पावसामुळे आंब्याचे नुकसान झाले आहे.

# ईडीची दोषसिद्धी फक्त ०.६८ टक्के ९९ टक्के प्रकरणात निकालच नाही

पान ८ वरून

पोहोचले. त्यानंतर २०२४-२५ या वर्षात ७७५, तर २०२५-२६ मध्ये तब्बल १,०८० प्रकरणांची नोंद करण्यात आली. जप्तीच्या आकडेवारीतही मोठी वाढ दिसून आली. २००५ ते २०१४ या काळात दरवर्षी सरासरी ५७४.५ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त अथवा संलग्न करण्यात आली होती. २०१४ ते २०२४ दरम्यान हा सरासरीचा आकडा वाढून ११,९३८.६३ कोटी रुपयांवर पोहोचला. २०२४-२५ मध्ये एका वर्षातच ३०,०३६.४१ कोटी रुपयांची जप्ती नोंदवण्यात आली, तर २०२५-२६ मध्ये हा आकडा ८१,४२२.६३ कोटी रुपयांवर गेला. दोषसिद्धीच्या बाबतीत २००५ ते २०१४ या काळात एकाही प्रकरणात शिक्षा झाली नव्हती. त्यानंतरच्या दहा वर्षांत ३८ प्रकरणांमध्ये निकाल लागले. २०२४-२५ मध्ये ९ प्रकरणांमध्ये शिक्षा झाली, तर २०२५-२६ मध्येही ९ प्रकरणांमध्ये शिक्षा झाली २०१९ नंतर ईडीकडून प्रकरणे निकाली काढण्याचा वेगही वाढल्याचे दिसत आहे. २०१९-२० मध्ये ३५, २०२०-२१ मध्ये ३६, तर २०२१-२२ मध्ये १४८ प्रकरणे बंद करण्यात आली. त्यानंतर २०२२-२३ मध्ये ६६, २०२३-२४ मध्ये ८५, २०२४-२५ मध्ये १९८ आणि २०२५-२६ मध्ये तब्बल ६८५ प्रकरणे निकाली काढण्यात आली.


**SBI**

**भारतीय स्टेट बँक**

कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई – ४०००२१

**सूचना**

भागधारकांच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतूंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असणाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथायोग्य पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेखा (विलेखां) सह / शिवाय, उक्त भागाचे यथाविधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिलिपी भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भागासंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे इश्यूसाठी रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट (आरटीए) मेसर्स केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड, सेलेनियम, टॉवर बी, प्लॉट क्रमांक ३१ आणि ३२, फाइनेंसियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, हैदराबाद, तेलंगणा – ५०० ०३२ (इमेल आयडी: **einward.ris@kfintech.com**) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिलिपी भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

**भारतीय स्टेट बँक**

| अनु क्र. | फोलियो क्र. | धारकाचे नाव | समभाग संख्या | प्रमाणपत्र क्रमांक पासून | प्रमाणपत्र क्रमांक पर्यंत | विभिन्न क्रमांक पासून | विभिन्न क्रमांक पर्यंत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०७४१०९३२ | तुलसी व्ही जी<br>मधु व्ही जी | ११०० | ६२११४८६ | ६२११४८६ | ८०१३०२६७५५ | ८०१३०२७८५४ |
| २ | ०७४१०९३१ | मधु व्ही जी<br>तुलसी व्ही जी | ११०० | ६२११४८५ | ६२११४८५ | ८०१३०२५६५५ | ८०१३०२६७५४ |
| ३ | ००५०६९९० | आमोद कुमार दास | ५३० | ६५०४० | ६५०४१ | ७३८८९८०५२१ | ७३८८९८१०५० |
| ४ | ०१८९८०७५ | आमोद कुमार दास | ५०० | १६२०७५ | १६२०७५ | ७४२७८१४५८१ | ७४२७८१५०८० |
| ५ | ०७४२६२८९ | कविता जोसेफ वलोन्थाएल | ३९६० | ६२२६४०० | ६२२६४०० | ८०१६२६६०४६ | ८०१६२७०००५ |

**वरील आकडे रु. १/– दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.**

स्थळ: मुंबई — समभागांची संख्या: ७११० — महाव्यवस्थापक

दिनांक: २३.०५.२०२६ — स.प्रमाणपत्रांची संख्या: ६ — (शेअर्स व बॉण्ड्स)



**महानिर्मिती**

**ई–निविदा सूचना क्र. ना.औ.वि.कें/२०२६–२७/०४**

| अ. क्र. | निविदा क्र. / विभाग | निविदा तपशील | अंदाजे रक्कम(रू.)/ इसारा रक्कम (रू.) |
|---|---|---|---|
| १ | ३००००६८७०५<br>सिव्हिल | ना.औ.वि.केंद्र एकलहरे येथिल सर्व प्रकारचे ९०८ निवासी गाळे (१११ इमारती) आणि एक मार्केट बिल्डिंग, सेवा योग्य साहित्य आणि मोडतोड साहित्य खरेदी करून नष्ट करण्याचे काम. | ४,५०,३५,१८२/–<br>४,५३,८६०/– |

नविन विक्रेते / नोंदणी नसलेल्या विक्रेत्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या कंपनीची ई–टेंडरिंगसाठी नोंदणी करावी. अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.

प्रत्येक निविदा किंमत रू. ११८०/– , अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया https://eprocurement.mahagenco.in येथे भेट द्यावी.

मुख्य अभियंता, नाशिक औ.वि.केंद्र, एकलहरे



**ANJUMAN-I-ISLAM, Mumbai**

**TENDER NOTICE FOR CANTEEN CONTRACT**

Sealed tenders are invited from experienced and reputed contractors for running Canteen at Anjuman-I-Islam's institutions at different locations in Mumbai.

**Eligibility Criteria :**

- The contractor must possess a valid FSSAI Certificate.
- 10 years' experience in managing institutional / industrial canteens.
- Compliance with all health, safety, and municipal regulations.

Tender forms may be collected from Anjuman-I-Islam, Secretariat, 92, Dr. D.N. Road, Opp. CSMT, Mumbai - 400 001 from **25th May 2026**, for Rs. 590/- (Inclusive of GST) which is non - refundable. Sealed Tenders may be submitted on or before **06th June 2026** by 2:00 p.m. at above mentioned address along with the earnest money deposit.

The Institute reserves the right to accept or reject any or all of the tenders received without assigning any reasons thereof.

Place : Mumbai
Date : 23-05-2026

**President**
**ANJUMAN-I-ISLAM**



**TENDER NOTICE**

**KARMASTAMBH INDUSTRIAL ESTATE CHS LTD.**

Situated at Haryali Village, Plot No.902, LBS Marg, Vikhroli (W), Mumbai-400083

**Sealed Item Rate Tender are Invited for Repair and Painting Work.**

Tender can be collected from Consultant Office
From: **23/05/2026 to 28/05/2026**
Between 11.00 Am To 5.00 Pm
Date of Submission on **29/05/2026**
(from 11:00 am to 6:00 pm.)
**At Karmastambh CHS Ltd Society Office.**
(Refer Address from above)
Note: Only Sealed Tender Package will be accepted

STAR ASSOCIATES PMC PVT. LTD.
Consulting Engineers

Office Address - B.O.Shop No.2, Bldg.No.6, A-Wing, Green Park, Near Gokul Village, Mira Road (East)
Tel. Office. 022 28554093 / 9820818155

**Tender Cost Rs. 4,000/- (Non-Refundable)**



**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**ई-निविदा आमंत्रण सूचना**

प्रधान मुख्य अभियंता, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि., आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा द्वारे सिंगल बिड प्रणाली अंतर्गत पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी खुली निविदा मागवित आहेत. **कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वेच्या वरिष्ठ क्षेत्रीय अभियंता, रत्नागिरी विभागांतर्गत एईएन/रत्नागिरी सेक्शनमधील शिंदे अंबेरी बोगद्यात ट्रॅकचे थ्रू डीप स्क्रीनिंग तसेच स्लीपर नूतनीकरण करणे. **निविदा सूचना क्र.: केआर-डब्ल्यू-1-58-2026-03. अंदाजित किंमत:** रु. 2,97,20,399/- जीएसटी वगळून. **बंद होण्याची दिनांक/वेळ:** 15.06.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाइन ऑफर/बोली सादर करण्यासाठी. **पूर्णत्व कालावधी:** पाच महिने मान्सून सह. मॅन्युअल ऑफर स्वीकारल्या जाणार नाहीत. तपशील/सहभागासाठी कृपया https://ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. दुरुस्तीपत्रक/परिशिष्ट केवळ याच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.



**PUBLIC NOTICE**

NOTICE IS HEREBY GIVEN TO PUBLIC AT LARGE that my client **M/s. Syncom Formulations (India) Limited** (CIN : L24239MH1988PLC047759) a company incorporated under Companies Act, 1956 having registered address at 7, Niraj Industrial Estate, Off. Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai City, Mumbai, Maharashtra, India, 400093 intends to purchase, commercial property more particularly mentioned in the schedule hereunder from HDFC Bank Limited, **(the "Property")** (CIN : L65920Mh1994PLC080618) a company incorporated under Companies Act, 1956 having registered office at Sandoz House, Dr. Annie Beasant Road, Worli, Mumbai - 400018.

The subject commercial Property viz. entire 7th Floor, comprising of Unit No's. 1, 2, 3 & 4 (which is mentioned as "Unit No's. A1, B2, B3, C4 on 7th Floor, A, B & C-Wing" in Share Certificate No. 031 dated 1st May, 2019) admeasuring about 1960 Sq. Mtr. carpet area along with total 40 car parking allotments in the Building known as Trade Star situated at Village Kondivita, Mathuradas Vassanji Road, Andheri (East), on land bearing Survey No. 65 Hissa No. 4 (pt), Hissa No. 5 (pt), Survey No. 65(A) Hissa No. 1 (pt), Hissa No. 2, Hissa No. 4 (pt), Hissa No. 7 (pt), Survey No. 66, Hissa No. 2 (pt) that were consolidated into C.T.S No. 240, 240/1, 240/2 are presently possessed and occupied by HDFC Bank Limited., under Agreement For Sale dated 14/08/2004 bearing Registration No. BDR4-04779-2004.

All person(s) having any share, right, title, benefit, interest, claim, objections & demands in respect of the said Property or any part thereof by way of sale, exchange, assignment, mortgage, charge, gift, trust, monument, inheritance, occupation, possession, tenancy, sub-tenancy, leave and license, caretaker basis, lease, sub-lease, lien, maintenance, easement, release through any agreement, conveyance, writing, bequest, succession, family arrangement, settlement, litigation, decree, order of any court of law, contract / agreement, or encumbrance or otherwise howsoever are hereby requested to make the same known in writing along with documentary proof/sufficient evidence **within 14 days** from the date of publication hereof failing which or as otherwise the sale transaction shall be completed without any reference or regards to any such claim or interest which shall be deemed to have been waived for all purposes.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

Commercial premise being entire 7th Floor, comprising of Unit No. 1, 2, 3 & 4 **(which is mentioned as "Unit No's. A1, B2, B3, C4 on 7th Floor, A, B & C-Wing" in Share Certificate No. 031 dated 1st May, 2019)** admeasuring about 1960 Sq. Mtr. carpet area along with total 40 car parking allotments in the Building known as Trade Star situated at Village Kondivita, Mathuradas Vassanji Road, Andheri (East), on land bearing Survey No. 65 Hissa No. 4 (pt), Hissa No. 5 (pt), Survey No. 65(A) Hissa No. 1 (pt), Hissa No. 2, Hissa No. 4 (pt), Hissa No. 7 (pt), Survey No. 66, Hissa No. 2 (pt) that were consolidated into C.T.S No. 240, 240/1, 240/2, Dist. Mumbai and within the registration district of Mumbai.

**Date : 23.05.2026**
**Place : Mumbai**

Sd/-
**PARAG S. MISHRA (Advocate High Court)**
503, Vaishali Shopping Centre, S. V. Road, Malad (West), Mumbai - 400067
E-mail:- psmishra.legal@gmail.com | Mobile : 9869126163/9004190735



**PUBLIC NOTICE**

**NOTICE** is hereby given that my Client is investigating and verifying the title of **DARSHANA APARTMENT CO-OPERATIVE HOUSING SOCITY LIMITED,** being a society registered under the provisions of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 under Registration No. BOM/WK/W/HSG/TC/9163/1996-97, having its registered office at Plot no. 198, Sarojini road, Vile Parle (West), Mumbai 400 056 (**"Society"**) and the details of the land and the building are more particularly set-out in the **Schedule** hereunder.

Any person having any claims, objections, rights, title, benefit, interest and/or demand of any nature whatsoever in respect of the Property or any part thereof by way of sale, exchange, lease, sub-lease, assignment, mortgage, charge, lien, inheritance, bequest, succession, gift, maintenance, easement, trust, tenancy, sub-tenancy, leave and license, care-taker basis, occupation, possession, family arrangement/ settlement, decree or order of any court of law, contracts/ agreements, development rights, project management agreement, development management agreement, memorandum of deposit of title documents, security or otherwise howsoever, are hereby required to make the same known in writing, along with documentary proof thereof, to the undersigned within **14(Fourteen)** days from the date hereof, failing which, such rights, title, benefit, interest, claim and/or demand of any nature whatsoever, shall be deemed to have been waived and/or abandoned and no such claim will be deemed to exist.

**THE SCHEDULE ABOVE REFERRED TO**

ALL THAT PIECE OR PARCEL OF LAND bearing C.T.S. Nos. 1506, 1506/1 to 1506/16, Plot no. 198, Sarojini road, Vile Parle (West), Mumbai 400056 land admeasuring 1065.90 sq. mtrs., Village Vile Parle, Taluka Andheri in K-W ward of Mumbai Suburban District of Mumbai City and Suburban along with building standing thereon known as "Darshana Apartment Co-Operative Housing Society Limited".

Date :- 23-05-2026

**Adv. Jay Vakil**
**(SEECONS INFRASTRUCTURES LLP)**
903, 9th Floor, Rasik C.H.S.L., Plot No. 114, Tilak Road No.6, Goregaon-W, Mumbai-400 104
adv.jayvakil@gmail.com

# स्टेट बँक ऑफ इंडिया आजपासून ६ दिवस बंद

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा




**मुंबई-** देशातील सर्वात मोठी सरकारी बँक स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखा (एसबीआय) उद्या म्हणजेच २३ मे ते गुरूवार २८ मे दरम्यान सलग सहा दिवस बंद राहणार आहेत. त्यामुळे ग्राहकांनी शाखेशी संबंधित सर्व महत्त्वाची कामे आगाऊ पूर्ण करून घ्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. २३ मे (चौथा शनिवार) आणि २४ मे (रविवार) या नियमित साप्ताहिक सुट्ट्या आहेत. सोमवार २५ आणि मंगळवार २६ मे रोजी बँक कर्मचाऱ्यांच्या संपामुळे कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे. पुढे बुधवार २७ आणि गुरुवार २८ मे रोजी बकरी ईद (ईद-उल-अजहा) निमित्त रिझर्व्ह बँकेने सुट्ट्या जाहीर केल्या आहेत. या सलग सुट्ट्यांमुळे चेक क्लिअरिंग, रोख व्यवहार, पासबुक अपडेट यांसारख्या शाखास्तरीय सेवा ठप्प राहू शकतात. मात्र, एटीएम, इंटरनेट बँकिंग आणि मोबाईल बँकिंग सेवा सुरू राहणार आहेत.

# आई होणे गुन्हा नाही! विनेश फोगाट प्रकरणात कोर्टाने महासंघाला फटकारले

■ नवी दिल्ली

**आई** झाल्यानंतर पुनरागमन करण्यासाठी प्रयत्न करणारी भारतीय कुस्तीपटू विनेश फोगाटला आज दिल्ली उच्च न्यायालयाने दिलासा दिला. न्यायालयाने भारतीय कुस्ती महासंघाला सुनावले की, आई होणे हा गुन्हा नाही. कोणत्याच खेळाडूला सूडाच्या भावनेने वागवले जाऊ शकत नाही. खेळ हा कोणत्याही वैयक्तिक शत्रुत्वापेक्षा मोठा आहे. खेळाडूंच्या भविष्याशी अशी वागणूक देणे हे खेळाच्या हिताचे नाही.

भारतीय कुस्ती महासंघाने विनेशला २६ जूनपर्यंत देशांतर्गत स्पर्धांमध्ये खेळण्यास 'अपात्र' घोषित केले होते. संघटनेने दावा केला की, निवृत्तीनंतर पुनरागमन



करणाऱ्या खेळाडूंना उत्तेजक-विरोधी नियमांनुसार सहा महिन्यांची पूर्वसूचना देणे आवश्यक आहे. मात्र, गेल्या वर्षी जुलैमध्ये आई झाल्यावर पुनरागमनाची तयारी करत असलेल्या विनेशने, गोंडा येथील राष्ट्रीय खुल्या मानांकन स्पर्धेत भाग घेतला. महिला कुस्ती संघटनेने अपात्र ठरवूनही, ३०-३१ मे रोजी होणाऱ्या या वर्षीच्या आशियाई खेळांसाठीच्या निवड स्पर्धेत सहभागी होण्याच्या मुद्यावर तिने न्यायालयात धाव घेतली होती. परंतु एकल खंडपीठाने याबाबतीत तिला दिलासा देण्यास नकार दिला होता. १८ मेच्या या आदेशाला विनेशने आव्हान दिले आहे. त्याची सुनावणी आज मुख्य न्यायमूर्ती डी. के. उपाध्याय आणि न्यायमूर्ती तेजस कारिया यांच्या खंडपीठासमोर पार पडली.

# २ मे रोजी झालेली पोलीस भरती परीक्षा रद्द

■ मुंबई

**नीट-यूजी** परीक्षेतील पेपरफुटीवर वादंग उठला असताना राज्य राखीव पोलीस बल (एसआरपीएफ), गट क्रमांक ५, दौंड येथे सशस्त्र पोलीस शिपाई भरतीसाठी २ मे रोजी घेण्यात आलेली परीक्षा रद्द करण्यात आली आहे. परीक्षा प्रक्रियेत गैरप्रकार झाल्याच्या तक्रारी आल्यामुळे ही परीक्षा रद्द करण्यात आली, असे अधिकृत निवेदनात म्हटले आहे.

रद्द झालेली ही लेखी परीक्षा आता २४ मे रोजी त्याच परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशिक्षण आणि विशेष विभाग) यांनी ही अधिकृत घोषणा केली आहे.

# रेल्वे भरती रखडल्याने उमेदवार संतप्त २६ मेपासून जळगावात आमरण उपोषण

■ जळगाव

**मध्य** रेल्वे भरती प्रक्रियेत २००७ साली परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आणि तब्बल १९ वर्षांनंतरही नियुक्ती न मिळालेल्या उमेदवारांनी आता आंदोलनाचा मार्ग अवलंबला आहे. प्रलंबित नियुक्त्यांच्या मागणीसाठी हे उमेदवार २६ मेपासून जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील जी.एस. ग्राऊंड येथे बेमुदत आमरण उपोषण करणार आहेत.

२००७ मध्ये मध्य रेल्वेसह भारतीय रेल्वेमध्ये रेल्वे भरती बोर्डामार्फत विविध पदांसाठी भरती प्रक्रिया राबवण्यात आली होती. इंजिनिअरिंग, तिकीट कलेक्टर, गँगमन आणि की-मॅन अशा विविध पदांसाठी जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. संबंधित उमेदवारांनी लेखी परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर २०११ मध्ये शारीरिक चाचणीही पूर्ण केली होती. त्यानंतरही नियुक्ती देण्यात आलेली नाही, असा आरोप उमेदवारांनी केला आहे. यापूर्वी २० एप्रिल रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे आमरण उपोषणासाठी परवानगी मागण्यात आली होती. पण प्रशासकीय कारणास्तव ही परवानगी नाकारण्यात आली. त्यामुळे न्याय मिळवण्याचा मार्ग रोखला जात असल्याचा आरोप उमेदवारांनी केला आहे. आता महाराष्ट्रातील सर्व वैद्यकीय पात्र उमेदवारांनी एकत्र येत जळगावात लोकशाही मार्गाने बेमुदत आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे.

# लासलगावमधील कांदा लिलाव २५ मेपासून बेमुदत बंद! व्यापाऱ्यांचा निर्णय

■ नाशिक

**ट्रकचालकांना** इंधन उपलब्ध होत नसल्यामुळे कांदा आणि इतर शेतीमालाची वाहतूक ठप्प होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे लासलगाव बाजार समितीतील कांदा व धान्याचे लिलाव २५ मेपासून बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय व्यापारी असोसिएशनने घेतला आहे. यासंदर्भात व्यापारी असोसिएशनने बाजार समितीला अधिकृत पत्र दिले आहे.

लिलाव बंद राहिल्यास कांद्याच्या दरात आणखी घसरण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आधीच युद्धजन्य परिस्थितीमुळे कांद्याच्या निर्यातीला फटका बसला आहे. गेल्या एक ते दीड वर्षांपासून बांगलादेशमध्ये कांद्याची निर्यात बंद असल्याने बाजारपेठेवर त्याचाही परिणाम झाला आहे. उन्हाच्या तीव्रतेमुळे कांदा खराब होत असून त्यामुळे दरात मोठी घसरण झाली आहे. सध्या जिल्हाभरात कांद्याला अवघा ५०० ते ६०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळत असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. त्यातच आता लिलाव बंद राहिल्यास दर आणखी कोसळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. लासलगाव बाजार समितीत दररोज सुमारे १० ते १५ हजार क्विंटल कांद्याची आवक होत आहे.

# एव्हरेस्ट उतरताना घात झाला दोन भारतीय गिर्यारोहकांचा मृत्यू

■ नवी दिल्ली

**जगातील** सर्वात उंच शिखर माऊंट एव्हरेस्ट सर करणे हे प्रत्येक गिर्यारोहकाचे स्वप्न असते.एव्हरेस्ट सर करणे ही सहजसाध्य बाब नाही. काही मोजकेच हा पराक्रम करतात. अशाच मोजक्या गिर्यारोहकांमध्ये दोन भारतीयांनी आपले नाव नोंदवले खरे,पण परतीच्या प्रवासात त्यांचा मृत्यू झाला.

नेपाळच्या बाजूने बुधवारी ३ भारतीयांसह तब्बल २७४ गिर्यारोहकांनी एकाच दिवशी माउंट एव्हरेस्टवर यशस्वी चढाई करून नवा जागतिक विक्रम रचला. मात्र, हा आनंद अल्पजीवी ठरला.अतिशय खडतर अशी ही चढाई करून प्रचंड थकल्याने एव्हरेस्टवरून उतरताना अरुण कुमार तिवारी आणि संदीप अरे या भारतीय गिर्यारोहकांचा मृत्यू झाला. नेपाळच्या एक्सपीडिशन ऑपरेटर्स असोसिएशनचे सरचिटणीस ऋषी भंडारी यांनी दिलेल्या माहितीनुसार एव्हरेस्टवरील अतिशय विषम हवामान आणि ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे तिवारी आणि अरे यांना प्रचंड थकवा आला.



अरुण कुमार तिवारी आणि संदीप अरे

त्यांचे शरीर साथ देईनासे झाले. त्यांच्यासोबत असलेल्या नेपाळी शेर्पा आणि गाईडनी त्यांना वाचवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. मात्र ते या दोघांचे प्राण वाचवू शकले नाहीत. भंडारी यांनी सांगितले की, संदीप अरे हे बुधवारी तर अरुण तिवारी हे गुरुवारी संध्याकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास एव्हरेस्टच्या शिखरावर पोहोचले होते. अरे यांचा गुरुवारी मृत्यू झाला.

# नसरापूर अत्याचारप्रकरणी २८ मे रोजी आरोप निश्चिती

■ पुणे

**पुणे** जिल्हा, भोर तालुक्यातील नसरापूर येथील चिमुरड्या बालिकेवर लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केल्याप्रकरणी आरोपी भीमराव प्रभाकर कांबळे याच्यावर २८ मे रोजी आरोप निश्चित केले जाणार आहेत. या प्रकरणी गुरुवारी झालेल्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने पुढील सुनावणी २८ मे रोजी ठेवली. त्याचदिवशी आरोपीवरील आरोप निश्चित केले जातील, असे स्पष्ट केले.

राजगड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या या संवेदनशील प्रकरणात आरोपी कांबळेविरुद्ध विविध कलमांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी न्यायालयात ११०० पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे. गुरुवारी झालेल्या सुनावणीसाठी विशेष सरकारी वकील ॲड. अजय मिसर, फिर्यादीचे वकील, पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल आणि तपास अधिकारी न्यायालयात उपस्थित होते. आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत असल्यामुळे कारागृह प्रशासनाने त्याला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजर केले.

# मुंबईची ॲक्वा लाईन पुन्हा विस्कळीत बिघाडामुळे मेट्रो ५० मिनिटे एकाच जागेवर

■ मुंबई

**मुंबई** मेट्रोच्या ॲक्वा लाईन ३ वर पुन्हा एकदा तांत्रिक बिघाड झाल्याने प्रवाशांना सकाळीच मोठा मनस्ताप सहन करावा लागला. अचानक सेवा विस्कळीत झाल्याने अनेक मेट्रो गाड्या विविध स्थानकांवर अडकून राहिल्या. काही ठिकाणी मेट्रो तब्बल अर्धा तास ते पन्नास मिनिटांपर्यंत थांबून होती.

एका गाडीमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने ॲक्वा लाईनवरील सर्वच गाड्या उशिराने धावत होत्या. प्रवाशांनी विचारणा केल्यानंतर प्रशासनाकडून केवळ तांत्रिक बिघाड इतकेच कारण सांगण्यात आले. विशेष म्हणजे, या भूमिगत मेट्रोमध्ये मोबाईलचा



सिग्नल मिळत नसल्याने अडकून पडलेल्या प्रवाशांना आपल्या कार्यालयात किंवा नातेवाईकांना माहिती देणेही कठीण झाले. नेटवर्क समस्येमुळे उशीर होत असल्याचे कळवताना प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. ॲक्वा लाईनची सेवा विस्कळीत झाल्याने सीएसएमटी आणि इतर मेट्रो -३ स्थानकांवर प्रवाशांची मोठी गर्दी झाली. गर्दी नियंत्रणात ठेवण्यासाठी सीएसएमटी प्रवेशद्वारासह काही स्थानकांमधील प्रवेश तात्पुरता बंद करण्यात आला होता.

# दादर कबुतरखाना हटवून रस्ता रुंदीकरण करा! उबाठाची मागणी

■ मुंबई

**दादर** येथील बंद कबुतरखाना हटवून तेथील रस्त्याचे रुंदीकरण करण्यात यावे, अशी मागणी उबाठाकडून करण्यात आली आहे. या संदर्भात पक्षाच्या नेत्यांनी मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांच्याकडे कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर दादरमधील प्रसिद्ध कबुतरखाना पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. कबुतरांच्या मोठ्या संख्येमुळे निर्माण होणाऱ्या आरोग्यविषयक आणि सुरक्षिततेच्या समस्यांमुळे हा निर्णय घेण्यात आला होता. मुंबई महानगरपालिकेने कबुतरखान्याभोवती ताडपत्री आणि बांबूचे आवरण घालून परिसर बंद केला. आमदार महेश सावंत आणि माजी नगरसेवक साईनाथ दुर्गे यांनीही या प्रश्नासंदर्भात आयुक्तांशी चर्चा करून तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे. उबाठाच्या मते, बंद अवस्थेतील कबुतरखान्यामुळे परिसर विद्रूप दिसत असून वाहतुकीच्या प्रवाहालाही अडथळा निर्माण होत आहे.

# वांद्र्यांच्या गरीब नगरमधील अतिक्रमण हटाव मोहीम पूर्ण

■ मुंबई

**वांद्रे** पूर्व येथील गरीब नगर झोपडपट्टी परिसरात पश्चिम रेल्वेकडून राबविण्यात आलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेत आज १०० टक्के बेकायदा बांधकामे हटवण्यात आली. तसेच उद्यापासून या परिसरात बॅरिकेडिंग आणि कुंपण उभारण्याचे काम सुरू करण्यात येणार आहे. पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांनी ही माहिती दिली.

या कारवाईदरम्यान स्थानिक नागरिक आणि पोलिसांमध्ये तणाव निर्माण झाला. संतप्त जमावाने पोलिसांवर दगडफेक केली, त्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला. या घटनेत एकूण १९ जणांना अटक करण्यात आली असून, त्यापैकी ३ जणांना २६ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. विनीत अभिषेक म्हणाले की, हटविण्याची आवश्यकता असलेली सर्व बेकायदा बांधकामे पूर्णपणे हटवण्यात आली आहेत. मात्र, उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार

### आजपासून कुंपणाचे काम सुरू

१०० संरचनांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. त्यामुळे या संरचनांचे केवळ तळमजले कायम ठेवण्यात येत असून, वरचे मजले अत्यंत धोकादायक असल्याने रेल्वे कर्मचारी ते हाताने काळजीपूर्वक पाडत आहेत, जेणेकरून खालील संरचनांना कोणतीही हानी होऊ नये. या १०० संरचनांमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना वरचे मजले स्वतः हटवण्याचा पर्याय देण्यात आला होता. मात्र, सुरक्षिततेच्या दृष्टीने हे काम रेल्वे प्रशासनाने स्वतः करण्याचा निर्णय घेतला.

# लखनौचे ७० न्यायाधीश सायकलने कोर्टात आले

■ लखनौ

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी केलेल्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत आज लखनौमधील सुमारे ७० न्यायाधीश आपापल्या सायकली घेऊन न्यायालयात दाखल झाले. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश राजेश सिंह चौहान यांच्या पुढाकाराने न्यायाधीशांनी इंधन बचतीचा संदेश देण्यासाठी हा सायकल प्रवास केला. सायकलींवर इंधन बचतीचा संदेश देणारे फलक लावण्यात आले होते. लखनौमधील अनेक वकील व न्यायालयातील कर्मचाऱ्यांनीही या मोहिमेत सहभाग घेतला. सायकल चालवणे शक्य नाही अशा कर्मचाऱ्यांनी ई-रिक्षा किंवा ई-बाईकचा पर्याय स्वीकारला. न्या.चौहान यांप्रसंगी म्हणाले की, मध्य-पूर्वेत सुरू असलेल्या युध्दामुळे इंधन संकट बिकट झाले आहे.

# गोव्यातील'अटल सेतू' साठी सरकार ५ कोटी खर्च करणार

**कलात्मक चित्रकाम**

**आर्ट गॅलरीचा लूक**

■ पणजी

**उत्तर गोवा** जिल्ह्यातील मर्सिस जंक्शन ते पर्वरी दरम्यानच्या अटल सेतू पुलाच्या सुशोभिकरणासाठी आणि कलात्मक चित्रकामासाठी राज्य सरकार ५.५७ कोटी रुपये खर्च करणार आहे.

हा अटल सेतू गोव्यातील पणजी आणि पर्वरी दरम्यान जाणारा केबल-स्टेड पूल आहे. तो मांडवी नदीच्या भरती-ओहोटीच्या भागातून राष्ट्रीय महामार्ग ६६ ला घेऊन जातो. तो ३.२ किलोमीटर लांबीचा आहे.त्यामुळे तो भारतातील चौथा सर्वात लांब केबल-स्टेड पूल म्हणून ओळखला जातो. गोवा पर्यटन विकास महामंडळाने या पुलाच्या भागाच्या कलात्मक रंगकामासाठी ५.५७ कोटी रुपयांच्या ई-निविदा मागवल्या आहेत. १५ मे रोजीच्या निविदा सूचनेनुसार, जीएसटीसह प्रकल्पाचा अंदाजित खर्च ५,५७,०७,८३२ रुपये आहे. पावसाळ्याचा कालावधी वगळता,हा प्रकल्प १८० दिवसांत पूर्ण करायचा आहे. या कामामध्ये नागरी कामांचा समावेश आहे, म्हणजेच प्रस्तावित पूल रंगकाम क्षेत्राची स्वच्छता, पुलाच्या खांबांसाठी आणि खांबांच्या टोपीसाठी प्राथमिक व संरक्षक रंग तसेच पुलाच्या खांबांना कलात्मक रंगाने रंगवले जाणार आहे. सुशोभीकरण पूर्ण झाल्यानंतर गोव्यातील या गजबजलेल्या वाहतुकीच्या रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांना एक वेगळाच अनुभव मिळेल आणि हा पूल एका मोठ्या खुल्या आर्ट गॅलरीसारखा दिसेल.

# श्री जोतिबा मंदिरात हापूस आंब्याची आरास

■ कोल्हापूर

**दख्खनचा** राजा श्री जोतिबा मंदिरामध्ये महापूजेसाठी नुकतीच हापूस आंब्यांची आरास करण्यात आली. ही आंब्यांची आरास आंब्याच्या डहाळ्यांसह केल्याने जोतिबा मंदिराच्या गाभाऱ्याला आमराईचे स्वरूप प्राप्त झाले होते. ज्येष्ठ महिन्याच्या सुरुवातीला प्रत्येकवर्षी मंदिरामध्ये आंब्याची आरास केली जाते. यंदाही आंब्याचा हंगाम सुरू असताना रत्नागिरी येथून हापूस आंबा आणून श्री जोतिबा मंदिराच्या गाभाऱ्यात आरास केली. जोतिबा मंदिरातील पुजारी गणेश झूगर, उमेश शिंगे, गणेश मिटके निलेश झुगर, ओमकार भोरे, सौरभ सांगळे, अमर बुणे, संजय ठाकरे अंकुश दादर्ज यांनी आमराईप्रमाणे ही आरास केली. आंब्याच्या डहाळ्या लावून त्यामध्ये आंबे लावल्याने मंदिराचा गाभारा हिरव्यागार आमराईसारखा दिसत होता.

नवाकाळ विजय उद्या वाचा




'नीट' माफियांचे आव्हान



वाचवूया वनौषधी




बोलबाला झुरळ पार्टीचा

# ईडीची दोषसिद्धी फक्त ०.६८ टक्के ९९ टक्के प्रकरणात निकालच नाही

**मनी लॉन्ड्रिंग प्रकरणांमध्ये आपला दोषसिद्धी दर ९३ टक्के असल्याचा दावा ईडीकडून केला जात असला, तरी नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीनुसार, हा आकडा गेल्या २० वर्षांतील केवळ सुनावणी पूर्ण झालेल्या ६० प्रकरणांवर आधारित आहेत. ही प्रकरणांची संख्या एकूण प्रकरणांच्या केवळ १ टक्के आहेत. नोंदवलेल्या एकूण प्रकरणांचा आकडा लक्षात घेतला तर ईडीच्या यशाचा हा वास्तविक दर केवळ ०.६८ टक्के आहे.**

■ नवी दिल्ली

**ईडीने** दोषसिद्धीचा दावा केलेल्या या ६० प्रकरणांपैकी ५६ प्रकरणांत १२४ आरोपी दोषी ठरले, तर ४ प्रकरणांत आरोपी निर्दोष सुटले. मालमत्ता जप्तीच्या बाबतीतही अशीच स्थिती दिसून येते. गेल्या दोन दशकांत ईडीने २ लाख ३६ हजार १६ कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या मालमत्ता तात्पुरत्या स्वरूपात जप्त अथवा संलग्न केल्या. मात्र, कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यापैकी केवळ ६५ हजार ८७२.७२ कोटी रुपयांच्या मालमत्ता कायमस्वरूपी जप्त करण्यात यश आले. यामुळे तपास आणि जप्तीची कारवाई मोठ्या प्रमाणावर झाली असली, तरी अंतिम कायदेशीर निकालापर्यंत पोहोचलेल्या प्रकरणांचे प्रमाण केवळ २८ टक्के असल्याचे स्पष्ट होते.

२०१४ नंतर मनी लॉन्ड्रिंग प्रकरणांमध्ये मोठी वाढ नोंदवण्यात आली आहे. २००५ ते २०१४ या कालावधीत ईडीकडून दरवर्षी सरासरी २०९ प्रकरणे नोंदवली जात होती. हे प्रमाण २०१४ ते २०२४ दरम्यान वाढून सरासरी ५११ प्रकरणांपर्यंत » पान ७ वर

# प्रशांत किशोर आश्रमात राहून जनसुराज पक्षाची बांधणी करणार

■ पाटणा

**राजकीय** रणनीतीकार म्हणून देशभरात ओळख मिळवणारे जनसुराज पक्षाचे संस्थापक प्रशांत किशोर आपले पाटणामधील राहते घर सोडून शहरापासून दूर असलेल्या पाटणा नवनिर्माण आश्रमात वास्तव्यासाठी गेले आहेत.बिहार विधानसभेची आगामी निवडणूक पार पडेपर्यंत आश्रमातच राहण्याचा निर्णय प्रशांत किशोर यांनी घेतला आहे.



पाटणा शहरात ते शिखपुरा हाऊस या आलिशान बंगल्यात राहात होते. या बंगल्यातूनचे ते पक्षाचा कारभार पहात होते. आता त्यांनी हा बंगला सोडला आहे.आता ते शहराच्या बाहेर आयआयटी पाटणाजवळ असलेल्या पाटणा नवनिर्माण आश्रमातील एका तंबूमध्ये राहून पक्षाची बांधणी करणार आहेत.

शिखपुरा हाऊस हा बंगला उदय सिंह यांच्या मालकीचा आहे. उदय सिंह हे भाजपाचे माजी खासदार आहेत. सध्या ते जनसुराज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत.